दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२२५ | रविवार, दि.०८ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

फडणविसांच्या कार्यक्षमतेची परिक्षा

महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर तिच्यातल्या तीन्ही पक्षांमधील एकात्मतेचे दर्शन लोकांना घडणे आवश्यक होते. त्याप्रमाणे घडून आले आहे. याचाच अर्थ असा नव्या सरकारच्या कार्यकाळाचा प्रारंभ तर मनासारखा झाला. 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है' या निवडणूक प्रचारकाळातील घोषणांना मतदारांनी उत्कट प्रतिसाद दिल्याचे मतमोजणीतून दिसून आले होतेच. याच भावनेचे प्रत्यंतर शपथविधी कार्यक्रमात आणि सरकारच्या रचनेत दिसून येण्याची आवश्यकता होती. हे व्यवस्थापन व्यवस्थित करण्यात आले. आता या सरकारला महाराष्ट्रासमोरील अनेक आव्हानांना सामोरे जाताना याच एकजुटीची सुनिश्चितता करायची आहे.

अबु आझमी, रईस शेख आघाडीतून बाहेर

मुंबई : राज्यातील महायुती सरकारला मिळालेल्या संशयातीत विजयाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या आमदारांनी सत्ताधाऱ्यांवर मतदान चोर अशी टीका करत सत्ताधाऱ्यांबरोबर आमदारकीची शपथ घेण्याऐवजी रविवारी शपथ घेणार असल्याची घोषणा केली. मात्र महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेल्या समाजवादी पार्टीचे आमदार अबु आझमी आणि आमदार रईस शेख यांनी सत्ताधाऱ्यांसोबत विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. त्यामुळे समाजवादी पार्टी महाविकास आघाडीतून बाहेर पडली की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान आमदार रईस शेख यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडणार असल्याचे संकेत दिले.

अर्थसंकल्पात किसान सन्मान निधी योजनेबाबत मोठा निर्णय?

अर्थमंत्री सीतारामन यांनी घेतली शेतकरी संघटना, कृषी अर्थतज्ज्ञांची बैठक

नवी दिल्ली । वृतसंस्था

१ फेब्रुवारी २०२५ ला अर्थसंकल्प सादर होणर आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या आगामी अर्थसंकल्पाची तयारीही सुरू झाली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी याबाबत दोन बैठका देखील घेतल्या आहेत. शनिवार सीतारामन यांनी शेतकरी संघटना, कृषी अर्थतज्ज्ञ आणि शेतकरी संघटनांच्या नेत्यांशी चर्चा केली आहे. त्यांच्या आकांक्षा आणि अपेक्षांसह सूचना आणि प्रस्तावांबद्दल माहिती जाणून घेतली. दरम्यान, या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना मोठे गिफ्ट मिळण्याची शक्यता आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेबाबत मोठा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

निर्मला सीताराम यांनी घेतलेल्या प्रदीर्घ बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. २ तास चाललेल्या बैठकीत, अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित समस्या आणि आव्हानांवर विस्तृत चर्चा केली. कृषी क्षेत्राच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि याद्वारे शेतकऱ्यांना कसा फायदा होऊ शकतो याबाबत अर्थमंत्र्यांनी शेतकरी संघटनांच्या प्रमुखांशी चर्चा केली आहे. ◀◀ पान २ वर

शेतकरी संघटना आणि कृषी संघटनांच्या प्रमुख मागण्या

शेतकरी संघटनांच्या प्रमुख मागण्यांपैकी सर्वात मोठी मागणी पीएम-किसान सन्मान निधीची रक्कम दुप्पट करण्याची होती. पीएम-किसान सन्मान निधीची रक्कम ६००० रुपयांवरून १२,००० रुपयांपर्यंत वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे, जी यापूर्वीही करण्यात आली होती. लहान शेतकऱ्यांनाही प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत आणण्याची मागणी करण्यात आली असून त्याअंतर्गत छोट्या शेतकऱ्यांना शून्य प्रिमियमवर पीक विमा काढण्याची सुविधा मिळावी, अशी व्यवस्था करण्याची शिफारस करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शेतकरी कर्जाचे व्याजदर कमी करण्याची मागणी करण्यात आली असून ते एक टक्क्यावर आणण्याची शिफारस करण्यात आली आहे. या बैठकीत कर आकारणीसाठी कर सुधारणांवर भर देण्यात आला असून त्याअंतर्गत सर्वप्रथम शेतीमध्ये वापरण्यात येणारी उपकरणे किंवा यंत्रे, खते किंवा बियाणे आणि औषधे यांना जीएसटीमधून सूट देण्याची मागणी अर्थमंत्र्यांसमोर ठेवण्यात आली आहे. राष्ट्रीय कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी प्रत्येक वर्षी आठ वर्षांसाठी १००० कोटी रुपयांचे उद्दिष्ट गुंतवणुकीचे धोरण आखण्यात यावे, हरभरा, सोयाबीन आणि मोहरी या विशेष पिकांवर लक्ष केंद्रित करावे, असा प्रस्तावही ठेवण्यात आला आहे, जेणेकरून शेतकरी या विशेष पिकांसाठी अधिक पैसे मिळू शकतात.

स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा

ठाणे, गुजरात मधील चौघांवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गोरगरीब रुग्णांवरील उपचारासाठी आधारस्थान असलेल्या अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ठाणे आणि सुरत (गुजरात) मधील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.

सध्याच्या खाजगी रुग्णालयातून मिळणाऱ्या महागड्या उपचारपद्धतीमुळे गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्ण स्वस्त आणि खात्रीपूर्वक उपचारासाठी स्वाराती रुग्णालयास प्राधान्य देतात. एका अर्थाने हे रुग्णालय गोरगरिबांसाठी जीवनवाहिनी आहे. मात्र या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधीचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे. या प्रकरणी औषधी निरिक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी, जि.ठाणे),द्विती सुमित त्रिवेदी (रा. सुरत) आणि विजय ◀◀ पान २ वर

विरोधकांचा शपथविधीवर बहिष्कार; ईव्हीएमच्या मुद्यावर सभात्याग

महाविकास आघाडीचे आमदार आज शपथ घेण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात महायुती सरकार सत्तेत आले असून शनिवारपासून (दि.७) विशेष अधिवशन बोलावण्यात आले आहे. पहिल्या दिवशी नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडणार होता. या शपथविधीवर महाविकास आघाडीसह विरोधी आमदारांनी बहिष्कार टाकला. विरोधकांनी सभात्याग केला आणि ते रविवारी (दि.८) शपथ घेणार असल्याचे सांगण्यात आले. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ईव्हीएमच्या मुद्यावर विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला असून सत्ताधाऱ्यांनी यावरून विरोधकांवर टीका केली आहे. ◀◀ पान २ वर

मतदान चोर सरकारचा निषेध – नाना पटोले

विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात भाजपा युतीचे सरकार आले असले तरी आपल्या मतदानाने हे सरकार आलेले नाही अशीच भावना जनतेला वाटत आहे. जनतेच्या मतांचे हे सरकार नाही. मारकडवाडीच्या लोकांची जी भावना आहे तीच राज्यातील बहुतांश जनतेची भावना आहे. जनभावनेचा आदर करत महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांनी शनिवारी शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.

नार्वेकरच होणार विधानसभा अध्यक्ष; उद्या निवड

महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांची निवड सोमवारी (दि.९) होणार असून रविवारी अर्ज दाखल केला जाणार आहे, अशी माहिती हंगामी सभापती कालिदास कोळंबकर यांनी विधानभवनात दिली. सोमवारी सकाळी विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल. त्यानंतर राज्यपालांचे विधानसभेत अभिभाषण होईल. अखेरच्या सत्रात पुरवणी मागण्या, विधेयके सादर केली जाणार आहेत. मावळते विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीच अध्यक्षपदी फेरनिवड होणार असून पुन्हा त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

उत्तमराव जानकर, सुनिल राऊत यांचा राजिनाम्याचा इशारा

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार उत्तमराव जानकर यांच्यासह शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार सुनील राऊत यांनी निवडणूक आयोगालाच आव्हान दिले आहे. यावेळी दोघांनी आयोगाने मतपत्रिकेवर निवडणूक घेतल्यास आपण आमदारकीचा राजीनामा देऊ. मतपत्रिकेवरील निवडणुकीसाठी आपण तयार असल्याचे म्हटले आहे. यावेळी जानकर यांनी, ईव्हीएमच्या विरोधासाठी मारकडवाडीत रविवारी शरद पवार येणार आहेत. आम्ही मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी आग्रही असून गरज पडल्यास मी आमदारकीचा राजीनामा देईन, असे त्यांनी म्हटले आहे. अशीच घोषणा आमदार सुनील राऊत यांनी केली असून आपणही मतपत्रिकेवर निवडणूक घेण्यासाठी आमदारकीचा राजीनामा देवू अशी भूमीका घेतली आहे.

पत्नीने केला पतीचा खून

सोलापूर : पंधरा वर्षांपूर्वी प्रेमविवाह केलेल्या पती-पत्नीमध्ये घरगुती कारणावरून झालेला वाद विकोपास गेला. त्यातूनच रागाच्या भरात पत्नीने पतीचा डोक्यात लाकडाने प्रहार करून खून केल्याची घटना दक्षिण सोलापूरात घडली. पतीचा खून केल्यानंतर पत्नीने स्वतः पोलिसांना मोबाईलद्वारे घटनेची माहिती कळविली. पोलिसांनी तिला अटक केली आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ४.०० क्विंटल		
किमान	कमाल	सरासरी
२,७१८	२,७२०	२,७१९
ज्वारी/हायब्रिड: २०.५० क्विंटल		
२,१५१	२,९३०	२,४६३
मका/लोकल: ७.०० क्विंटल		
२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : २२.०० क्विंटल		
६,२०१	६,८५०	७,५००
उडीद : ०.५० क्विंटल		
६,०००	६,०००	६,०००
बाजरी: १४.०० क्विंटल		
२,२००	३,१०१	२,४९७
मुग : २.५० क्विंटल		
७,३०१	७,३०१	७,३०१
सोयाबीन: ३४५.५० क्विंटल		
३,५००	४,२८०	४,०९३
हरभरा: २.०० क्विंटल		
४,४०१	६,८०१	५,४०१

अजित पवार यांना बेनामी संपत्ती प्रकरणात क्लीनचीट

हजार कोटींची मालमत्ता मिळणार परत

नवी दिल्ली । वृतसंस्था

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये आयकर विभागाने अजित पवार आणि कुटुंबियांची १ हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली होती. ती मालमत्ता मुक्त करण्याचे आदेश दिल्लीतील बेनामी मालमत्ता व्यवहार प्रतिबंधक अपीलीय न्यायाधिकरणाने दिले आहेत. या निर्णयानंतर जप्त केलेली मालमत्ता प्राप्तिकर विभागाकडून अजित पवार यांना परत करण्यात येणार आहे. बेनामी मालमत्ता बाळगल्याच्या आरोपांच्या विरोधात अजित पवारांनी अपील केल्यानंतर त्यांना ही क्लिनचीट मिळाली आहे.

सदर प्रकरणाची सुरुवात ७ ऑक्टोबर २०२१ रोजी झाली. त्या दिवशी आयकर विभागाने अनेक कंपन्यांवर छापे टाकले, अजित ◀◀ पान २ वर

आमच्यासोबतही तेच घडले, लोकसभेतील आकडेवारी देत देवेंद्र फडणवीस यांचे शरद पवारांना चोख उत्तर

मुंबई । प्रतिनिधी

कोल्हापूरमध्ये बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाची आकडेवारी देत काही प्रश्न उपस्थित केले होते. काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत ८० लाख मते पडली तरी त्यांच्या १६ च जागा आल्या आणि शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते पडली म्हणजे काँग्रेसपेक्षा एक लाख कमी मते पडली तरी त्यांच्या ५७ जागा आल्या, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभेला झालेल्या मतदानाची आकडेवारी देऊन चोख प्रत्युत्तर दिले आहे. फडणवीसांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिले आहे.

फडणवीस, शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मते मिळूनही कमी जागा कशा? चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, भाजपाला मते १,४९,१३,९१४ आणि जागा ९, पण काँग्रेसला मते ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मते ◀◀ पान २ वर

देशभरात २८ नवोदय विद्यालयांना मंजुरी!

मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती, दर्जेदार शिक्षणाला मिळणार चालणा

मुंबई । प्रतिनिधी

देशातील ज्या जिल्ह्यांमध्ये नवोदय विद्यालये नाहीत, त्या २८ जिह्यांमध्ये नवोदय विद्यालये स्थापन करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. याचा प्रारंभ महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात नवोदय विद्यालय सुरू करून करण्यात येणार आहे. या संदर्भातील माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.७) त्यांच्या एक्स अकाऊंटवरून दिली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय मंत्रिमंडळाने नवोदय विद्यालय योजना विस्तारासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये नवोदय विद्यालये नाहीत, अशा २८ जिल्ह्यांमध्ये ही विद्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून यासाठी एकूण अंदाजे २,३५९.८२ कोटींचा निधी खर्च करण्यात येणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला आहे. देशाच्या शिक्षण क्षेत्रातील हे क्रांतिकारक पाऊल असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

८५ नवीन केंद्रीय विद्यालयांनाही मंजुरी

देशातील १९ जिल्ह्यांमध्ये ८५ नवीन केंद्रीय विद्यालये उघडण्यात येणार आहेत. यापैकी सर्वात जास्त जम्मू आणि काश्मीरमध्ये १३, मध्य प्रदेशात ११, राजस्थानमध्ये ९, ओडिशामध्ये आणि आंध्र प्रदेशमध्ये प्रत्येकी ८, उत्तर प्रदेशमध्ये ५, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमध्ये प्रत्येकी ४, कर्नाटक, गुजरात आणि महाराष्ट्रात प्रत्येकी ३, झारखंड आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी २, दिल्ली, केरळ, आसाम आणि अरुणाचल प्रदेशात प्रत्येकी १ केंद्रीय विद्यालय सुरु केले जाणार आहे. केंद्रीय विद्यालयांतून ८२ हजार ५६० विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाचा लाभ मिळणार असून, या विद्यालयांमध्ये ५ हजार ३८८ नियमित पदांची भरती केली जाणार आहे.

पंधरा हजार विद्यार्थ्यांना फायदा

नवोदय विद्यालयातील एका प्रकल्पांतर्गत एकूण ५६० विद्यार्थी क्षमता असणार आहे. त्यामुळे एकूण १५ हजार ६८० विद्यार्थ्यांना या विद्यालयांचा लाभ घेता येणार आहे. एक पूर्ण विद्यालय चालवण्यासाठी समितीने निश्चित केलेल्या निकषांच्या बरोबरोने पदे देखील निर्माण केली जातील, असे केंद्रीय आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने माहिती दिली आहे.

ठाणे येथे नवोदय तर अकोला, रत्नागिरी आणि पुणे येथे केंद्रीय विद्यालये

महाराष्ट्रात तीन नवीन केंद्रीय विद्यालये सुरू करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मंजुरी मिळाली आहे. अकोला, रत्नागिरी आणि पुणे येथे ही विद्यालये सुरू होणार आहेत. ठाण्यात नवीन नवोदय विद्यालय सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यामुळे या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना चांगली शिक्षण सुविधा मिळणार असून, त्या त्या जिल्ह्याचा शैक्षणिक दर्जाही सुधारणार आहे.

अग्रलेख

फडणविसांच्या कार्यक्षमतेची परिक्षा

महायुतीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर तिच्यातल्या तीन्ही पक्षांमधील एकात्मतेचे दर्शन लोकांना घडणे आवश्यक होते. त्याप्रमाणे घडून आले आहे. याचाच अर्थ असा नव्या सरकारच्या कार्यकाळाचा प्रारंभ तर मनासारखा झाला. 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक है तो सेफ है' या निवडणूक प्रचारकाळातील घोषणांना मतदारांनी उत्कट प्रतिसाद दिल्याचे मतमोजणीतून दिसून आले होतेच. याच भावनेचे प्रत्यंतर शपथविधी कार्यक्रमात आणि सरकारच्या रचनेत दिसून येण्याची आवश्यकता होती. हे व्यवस्थापन व्यवस्थित करण्यात आले. आता या सरकारला महाराष्ट्रासमोरील अनेक आव्हानांना सामोरे जाताना याच एकजुटीची सुनिश्चितता करायची आहे. हे या सरकारसमोरील प्रथम आव्हान आहे. कारण, महायुतीतील सर्व पक्षांना भरभरुन जागा मिळाल्या आहेत. असे घडते तेव्हा सर्वच पक्षांच्या अपेक्षा वाढतात. पण मंत्रिपदे कायद्यानुसार ठराविक संख्येतच उपलब्ध असल्याने सर्व इच्छुकांचे समाधान करणे हे आव्हानच असते. ते कसे पार केले जाते ते लवकरच दिसून येईल. पण या पलीकडे जाऊन खरे आव्हान आहे, ते जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याचे. त्यासाठी या सरकारकडे पाच वर्षांचा अवधी आहे. पण पाच वर्षे हा कालावधी प्रारंभी मोठा वाटला तरी कसा झरझर संपतो हे कळत नाही. त्यामुळे प्रथम क्षणापासूनच राज्याच्या विकासासाठी नव्या मुख्यमंत्र्यांना आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना लक्ष केंद्रीत करुन प्रयत्न करावे लागतील.

फडणवीस २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांनी त्यांच्या कार्यक्षमतेचा परिचय दिलेला आहे. अविश्रांत परिश्रम करणे हा त्यांचा स्वभावच आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नेतेही त्याच मानसिकतेचे आहेत. त्यामुळे प्रयत्नांमध्ये हे सरकार कोठेही कमी पडणार नाही, असा विश्वास वाटतो. तथापि, या सरकारसमोरील आव्हाने खरोखरच मोठी आहेत. अनेक दशकांपासून महाराष्ट्र हे उद्योगक्षेत्रात आघाडीवर असणारे राज्य म्हणून परिचित आहे. ही आघाडी टिकविण्यासाठी कल्पकता आणि धनस्रोत यांची सांगड घालावी लागेल. पायाभूत सुविधांचा विकासही नेटाने पुढे न्यावा लागेल. निवडणुकीत मिळालेल्या यशात 'लाडकी बहीण' आदी योजनांचे योगदान महत्त्वाचे आहे. या योजनांमधून महिलांच्या बँक खात्यांवर थेट पैसे जमा होतात. या योजनेच्या लाभार्थी महिलांची संख्या पाहता राज्य सरकारला प्रतिवर्ष जवळपास ५० हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. शिवाय विकासकार्यांनाही पैसा कमी पडू नये हे पहावे लागेल. 'व्यक्तीगत विकास आणि राज्याचा विकास यांच्यात आम्हाला समतोल साधावा लागेल' असे विधान देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत व्यक्त केले होते. लोकांच्या खात्यात थेट पैसे जमा केल्याने व्यक्तीगत विकास होऊ शकतो. पण त्यासाठी सरकारी तिजोरीतून जो खर्च करावा लागतो, त्याचा परिणाम म्हणून विकासासाठी धन कमी पडू नये, ही तारेवरची कसरत या सरकारला करावी लागणार आहे. सरकारचे उत्पन्न वाढावे यासाठी नवे मार्ग शोधावे लागतील. कृषी क्षेत्र हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा आजही कणा आहे. हा कणा सुदृढ राखणे हे जटील आव्हान आहे. कृषी क्षेत्रात मोठी गुंतवणूक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला तरच हे आव्हान पेलता येईल, असा विचार तज्ञ व्यक्त करतात. उद्योग आणि कृषी ही दोन क्षेत्रे रोजगारनिर्मितीचे प्रमुख स्रोत आहेत. त्यामुळे रोजगारक्षम उद्योगांची वाढ आणि तशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा विकास करण्यात राज्य सरकारला पुढाकार घ्यावा लागणार आहे. राज्यातील छोटे उद्योग अन्य राज्यात स्थलांतरित होत आहेत, अशी वृत्ते मध्यंतरीच्या काळात प्रसिद्ध झाली होती. हे स्थलांतर रोखून महाराष्ट्र उद्योग-व्यापारासाठी आकर्षक स्थान म्हणून विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. गेल्या तीन दशकांच्या काळात गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक इत्यादी राज्यांनी मोठे उद्योग आकर्षित करण्याच्या कामात मोठी प्रगती केल्याचे दिसून येते. त्यामुळे या संदर्भातली स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत जाणार आहे. महाराष्ट्र या स्पर्धेत अग्रेसर राहील हे या सरकारला पहायचे आहे. विदेशी गुंतवणुकीत आजही महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. हे अग्रस्थान टिकवून धरण्यासाठी प्रयत्न करावे लागतीलच. केवळ उद्योग आणि कृषी ही दोनच नव्हे, तर इतर सर्व क्षेत्रेही लक्षात घ्यावी लागतील. सामाजिक क्षेत्रातली आव्हानेही कमी नाहीत. मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि त्यातून निर्माण झालेला मराठा-अन्य मागासवर्गियांमधील वाद हा कळीचा मुद्दा आहे. उद्धव ठाकरे सरकारच्या काळात या वादाला कळून सवरुन असेल किंवा न कळत असेल पण खतपाणी घातले गेले. नंतर पुन्हा महायुतीचे सरकार आले, त्या सव्वादोन वर्षाच्या काळात हा वाद फुलविला गेल्याचेही स्पष्ट दिसून आले. असे वाद प्रगतीला अडथळा निर्माण करतात हे नव्याने सांगायची आवश्यकता नाही. सर्व संबंधित समाजघटकांना विश्वासात घेऊन त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न हे सरकार कसा करते, हे लवकरच दिसून येईल. अगदी महत्त्वाचे म्हणजे, सध्या विरोधी पक्ष अत्यंत आकुंचित झाला आहे. त्यामुळे 'आपल्याला कोणी स्पर्धक नाही' ही भावना सत्ताधाऱ्यांमध्ये बळावण्याची शक्यताही असते. ही भावना आपल्यावर स्वार होऊ न देणे याची दक्षता बाळगावी लागेल. अशी अनेक आव्हाने पेलताना मिळणाऱ्या यशाचे प्रमाण कमी-अधिक असू शकते. पण प्रयत्न प्रामाणिक आणि योग्य दिशेने केला गेला तर त्याची नोंद जनता निश्चितच घेते.

प्रधानमंत्री पिक विमा प्रशिक्षण उत्साहात संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

आज दिनांक रोजी भारतीय कृषी विमा कंपनी यांच्यामार्फत आज वडवणी तालुक्यातील देवडी या गावी प्रधानमंत्री फसल विमा सप्ताहाचे उत्साहा मध्ये आयोजन करण्यात आले होते या वेळी गावातील सरपंच श्री विजय मला अरुण झाटे,उपसरपंच नुकसानाबाई उस्मान शेख सदस्य सचिव राजेभाऊ झाटे, श्री भास्कर झाटे, मछिंद्र बप्पा झाटे,गीतेश आगे, हरिषी बादाडे, ओम पुरी तसेच गावातील मान्यवर शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून वडवणी तालुका कृषी अधिकारी श्री खेडकर साहेब , कृषी अधिकारी श्री बांगर साहेब, मंडळ कृषी अधिकारी श्री ढाकणे साहेब, उपस्थित होते यावेळी उपस्थित शेतकरी यांना पिक विमा योजनेबाबत विस्तृत माहिती व मार्गदर्शन भारतीय कृषी विमा कंपनी जिल्हा व्यवस्थापन श्री बाबासाहेब ईनकर यांच्यामार्फत देण्यात आले जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी एक रुपयांमध्ये सदर योजनेचा लाभ घेऊन आपले पीक विमा संरक्षित करावे. स्थानिक नैसर्गिक आपत्तीमध्ये टाळता न येणाऱ्या जखमीपासून व नैसर्गिक आपत्ती पासून पिकाचे संरक्षण करून घ्यावे. तसेच उपस्थित शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण देखील करण्यात आले या कार्यक्रमाचे नियोजन भारतीय कृषी विमा कंपनी तालुकास्तरीय कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात आले होते त्यामध्ये श्री लहू सावंत, श्री गणेश चोरमले, श्री प्रसाद सावंत, श्री कृष्णा थोरात, श्री प्रमोद चव्हाण इत्यादी तालुकास्तरीय कर्मचारी उपस्थित होते. देवडी गावातील रेणूबाई देवी विद्यालय येथील विद्यार्थ्यांद्वारे प्रभात फेरी काढून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा योजनेमध्ये सामील होण्याबाबत आव्हान करण्यात आले. विमा भरण्याची शेवटची तारीख ही १५ डिसेंबर २०२४असून यापूर्वी शेतकरी बांधवांनी आपल्या हरभरा गहू व कांदा या पिकाचे विमा संरक्षण काढून घ्यावे असे आव्हान मान्यवरांनी केले.

सणासुदीलाच लाईट का जाते ?

मला थोडेसे खरंतर थोडेसे नाहीच बरेच बोलायचे ते हि बऱ्याच विषयावर. असो. आता दिवाळी होऊन गेली. लक्ष्मीपूजन ला संध्याकाळी पूजेच्या वेळेतच सर्व लाईट्स गेले. नंतर लगेच १ मिनट लागायची अन परत जायची.

असे हे का घडले? याचा विचार आपण केला का? समाज शांत,थंड कोणी काहीच बोलले नाही आणि पुढे काही करायचे धाडस हि नाही. वर्षभरातील सर्व महत्वाच्या सणाला घरात बाहेर सगळी कडे अंधार. खरंतर, समाजात, मनात आणि आपल्या डोक्यात सगळीकडे भयानक अंधार काळोख दिसला.

पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर हि अंधारात दिसले.

आपण थोडे थोड्या गोष्टीला रस्त्यावर उतरतो, आंदोलन करतो.

एखादा विषयला बंद पुकारतो, मधेच शाळा कॉलेजस सोडायला लावतो. उठसुठ प्रवासाच्या एस.टी. फोडतो, सार्वजनिक माल मत्येतेच नुकसान करतो. मग हाच समाज सणावारात लाईट्स जातात मग शांत का बसतो. आपल्या पैकी काही जणांना आठवत असेल की कित्येक वेळेला लाईट जाण्याचे प्रसंग आपण पहिले २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट ला बरोबर सकाळीच लाईट जात असे.

गौरी महालक्ष्मी येतात त्या वेळेस हि घरात अंधार, महालक्ष्मी जेवतात त्याच दिवशी अंधार, दसऱ्या च्या दिवशी ऐन संध्याकाळी सिमोलघणं च्या वेळेस ही तेच. आता खरेतर अंधार घरात होण्यापेक्षा आपल्या डोक्यात, मनात, विचारात अंधार आहे. आपण यावर राग काढतो पण हाच राग समाजाणे रसत्यावर उतरून का काढत नाही? असे का होते हे जाब विचारत नाही. आपले रक्त इतके थंड का?

या साठी जेंव्हा रस्त्यार उतरले जाईल त्या वेळेस सर्व यंत्रणा जाग्या होतील, शासन, प्रशासन, राजकीय पक्ष, समाजिक संस्था,अनेक समाजिक यंत्रणा या जाग्या होतील त्या वेळेस खऱ्या अर्थाने आपल्या मनातील अंधाकर जाईल. आपल्या तील काही तरुण मंडळी, कॉलेज ची मुले या जाग्या झाल्या तर खूपसं समाजिक रूप बदलेल. आपण सर्व जागे झालोत तर अनेक दैनंदिन गोष्टी सुरळीत होतील. पण यासाठी आपण जागे राहणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विजपुरवठा चे खाजगी करण झाले, भरमसाठ लाईट बिल येते सामान्य माणसाचे कधी कधी पगार हि होत नाही तेवढा.

परत यांचे मार्च महिन्यातील नखरे ज्यादा बिल काढतात परत हेच लोक म्हणतात येतेच या महिन्यात अरे बाबांनो पण कसे ते तर सांगा.

खाजगी करण तुमचे झाले आता बाकी सगळी कसरत आमच्या जीवावर का?

बर खाजगी करण झाले असले तरी त्यात काम करणारे कामगार तर याच समाजाचे घटक आहेत मग तरी असे का.की याचे हि खाजगी करण होऊन आपली संस्कृती आणि आपले सणवारचे महत्व विसरले का?

अश्या वेळेस अनेक कारणे महावितरण पुढे करते, डी.पी. जळाली, शॉट सर्किट झाले कनेक्शन लूज होते. खरे तर आपण जागे होऊन याचे कनेक्शन लूज करू शकतो. पण आपण लोक थंड,शांत,कुणाशी कोणाला काही घेणे देणें नाही.प्रत्येक

सणाला लाईट का जाते हा जाब विचारला पाहिजे.

हिच वेळ आहे आपण जागे होण्याची आणि या लोकांना जागे करण्याची. मी तर जागी आहेच. पण तुम्ही ही व्हावे .महावितरणे एकच ध्यानात घ्यावें माझी तुम्हाला नम्र विनंती की प्रत्येक सणाला लाईट राहू देत आणि असेही लाईट राहिली नाही तर या वेळेस याद राखा मी एकटी नाही पूर्ण बीड शहर सोबत घेऊन येईल तुमच्या ऑफिस मध्ये. मग पाहू नेमकी कोणतती डी.पी. गेली अन कुठे शॉर्ट सर्किट झालं. जागे व्हा, संघटित व्हा.निर्णय घ्या आणि जिवंत व्हा

रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९

म्हसोबावाडी : जेजुरी येथील उद्योजक पांडुरंग सोनवणे यांनी आष्टी येथे भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना एलआयसीचे इन्शुरन्स ॲडव्हायझर अतिक शेख, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सरपंच दत्तात्रय खोटे, पंडीत यादव, सामाजिक कार्यकर्ते रशिद शेख, पत्रकार निसार शेख, समीर शेख, संतोष नागरगोजे, अण्णासाहेब साबळे, अक्षय विधाते, अशोक माने, शिवाजी गांगर्डे आदी दिसत आहेत.

बीड: माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक थिटे ए.एस. पर्यवेक्षक राजेंद्र रांजवन ,राजेंद्र सोनवणे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये नैराश्य अधिक-डॉ.जगदीश टेकाळे

बीड। प्रतिनिधी

नैराश्य हा एक प्रकारचा मनोविकार असुन जो कोणत्याही वर्गाच्या लोकांना प्रभावित करु शकतो. तथापि, पुरुषांपेक्षा स्त्रियांना सामान्यत: नैराश्याने जास्त प्रभावित केले आहे. आजचा धकाधकीचा काळ जितका पुरुषांसाठी तितकाच महिलांसाठीही त्रासदायक आहे. अशा स्थितीत विश्रांतीचा अभाव,इतरांच्या गरजा स्वत:वर टाकून आणि सदैव अपेक्षेप्रमाणे जगणे,यामुळे आज स्त्री ही नैराश्याच्या गर्तेत झोकली जाते.

याशिवाय जैविक,हार्मोनल कारणे आणि सामाजिक दबावदेखील नैराश्याला प्रोत्साहन देतात. मग काही स्त्रिया त्यांचे करिअर धोक्यात आल्यावर किंवा मुलांच्या जन्मानंतरही तणावामुळे नैराश्यात जातात. विशेषत: महिलांमध्ये नैराश्य निर्माण करणारी अनेक कारणे आहेत. बहुतेक महिलांना हे सुध्दा माहित नसते की आपण नैराश्याच्या बळी होत आहोत. चिडचिड होणे, थकवा जाणवणे,कामात अनास्था, झोपेचा अभाव/निद्रानाश, वजन कमी होणे किंवा वाढणे, भूक वाढणे/घटणे, नकारात्मक विचार, आरोग्याकडे दुर्लक्ष आदी कारणांमुळे नैराश्य उदभवते असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षकपदी डॉ.केतन गायकवाड यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

हरियाणा (रोहतक) येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र शालेय १९ वर्षाखालील मुलांच्या कबड्डी संघाच्या प्रशिक्षकपदी एन.आय.एस. कोच प्रा .डॉ. केतन गायकवाड यांची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे एन.आय.एस. कोच प्रा डॉ. केतन गायकवाड यांची शासनाने नियुक्ती केली आहे. शारदा स्पोर्ट्स अकॅडमी चे उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा.डॉ.केतन गायकवाड यांची निवड झाल्याने त्यांच्या रूपाने बीड जिल्ह्यातल्या ग्रामीण भागाला प्रतिनिधित्व मिळाल्याने क्रीडा जगताप आनंद व्यक्त केला जात असून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

अकोला येथील क्रीडा संकुलात राज्यातील निवड झालेल्या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले त्यानंतर राष्ट्रीयस्पर्धेसाठी(रोहतक)हरियाणा येथे संघ रवाना झाला. सदरील स्पर्धा ७ ते १२ डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व क्रीडा मंत्रालयातून खेलो इंडियाच्या कबड्डी प्रशिक्षक म्हणून एन.आय. एस. कोच प्रा.डॉ.केतन गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजी नगर संचलित बीड येथील बलभीम महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विभागाचे अधिव्याख्याता प्रा. डॉ. केतन गायकवाड यांची दिल्ली येथे २०१८ या वर्षात आयोजित करण्यात आलेल्या शालेय राष्ट्रीय १९ वर्षे वयोगटाच्या कबड्डी स्पर्धेसाठी प्रशिक्षक पदी नियुक्ती झाली होती. २०२२ या वर्षात हरियाणा येथे झालेल्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रशिक्षक म्हणून पद भूषविले आहे प्रा. डॉ. केतन गायकवाड हे महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस मा. आ. अमरसिंहजी पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई येथे हिंद क्रीडा मंडळ संचलित शारदा स्पोर्ट्स अकॅडमी येथे कबड्डीचे प्रशिक्षक म्हणून काम करत आहेत. शारदा स्पोर्ट्स अकॅडमी मध्ये राज्यातील व राज्याबाहेरील खेळाडूंना तंत्रशुद्ध कबड्डी प्रशिक्षणाचे धडे ते देत आहेत. तसेच जिल्ह्यातील विविध नवोदित होतकरू खेळाडूंना कबड्डीचे प्रशिक्षण देत आहे. सातत्याने कबड्डी खेळातील विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचे काम प्रा. डॉ. गायकवाड यांनी केले आहे. खेलो इंडिया युथ गेम्स कबड्डी प्रशिक्षक पदी निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री

शिवाजीराव पंडित, महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब, जय भवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंग पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान आ.विजयसिंह पंडित, युवा नेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, स्विय्य सहाय्यक अमृत डावकर, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव तथा प्राचार्य डॉ विश्वास कदम, प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा. काशिनाथ गोगुले, निवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुहासिनी देशमुख, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, बलभीम महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. वसंत सानप, आर. बी. अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनीताई शिखरे, राष्ट्रीय खेळाडू दगडू चव्हाण, प्रा. राजेंद्र बरकसे, प्रा. डॉ. भागचंद सानप, प्रा. डॉ. शंकर धांडे, प्रा. डॉ. राजेश क्षीरसागर, मधुकर अण्णा गर्जे ,डॉ. ब्रह्मनाथ मेंगडे प्रा. जगदाळे डॉ नागनाथ मोटे, प्रा. डॉ. दत्तापुरे डॉ .संतोष घोरपडे, गोपाल मोटे, नितीन निंबाळकर, कैलास जगदाळे, प्रताप शेंडगे, वनराज गिरी, विजय जाहेर, विजय अपसिंगेकर, प्रा. रविंद खरात, मयूर मोटे आदींनी प्रा.डॉ. केतन गायकवाड यांचे अभिनंदन करून खेलो इंडिया युथ गेम्स साठी त्यांना आणि संघाला शुभेच्छा दिल्या.

पान १ वरून...

अर्थसंकल्पात किसान सन्मान निधी

भारत कृषक समाजाचे अध्यक्ष अजय वीर जाखड यांनी कृषी उत्पादकता अधिक महत्त्वाची बनविण्याबरोबरच शेतकऱ्यांचे हित वाढवण्याच्या उद्देशाने गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याची गरज व्यक्त केली आहे. दरम्यान, अर्थसंकल्पात पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा निधी डबल म्हणजे १२ हजार होण्याची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे. हा निर्णय झाल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

विरोधकांचा शपथविधीवर बहिष्कार;

विशेष अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधान भवनात मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आमदारकीची शपथ घेतली. यानंतर नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडत असतानाच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे नाव पुकारले असता सर्व आमदार बाहेर पडले. तसेच ईव्हीएमच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांचे ४९ आमदार आज शपथ घेणार नसल्याचे जाहीर केले. यावेळी आदित्य ठाकरे, सुनील प्रभू, जितेंद्र आव्हाड यांच्यासह अेक विरोधी आमदारांनी सभागृ सोडत शपथ घेतली जाणार नाही, अशी माहिती दिली. तसेच याआधी विरोधकांनी विधानभवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तर शपथ न घेण्यामागे ईव्हीएमला विरोध असण्याचे कारण सांगितले. यावेळी भास्कर जाधव यांनी सध्याचे महायुतीचे सरकार पाशवी बहुमाच्या जोरावर आले असून त्याला राज्यातील जनतेचा जनाधार नाही. यामुळे विरोध असल्याचे जाधव यांनी म्हटले आहे. विरोधकांच्या शपथविधीवरील बहिष्कारवरून अजित पवारांनी टीका केली आहे. त्यांनी, ईव्हीएम बाबत बोलणे म्हणजे विरोधकांचा रडीचा डाव आहे. जनतेने महाविकास आघाडीला बहुमत दिले आहे. याआधी विरोधकांचा लोकसभेत विजय झाला. तेंव्हा ईव्हीएम चांगले होते. पण आता विधानसभा निवडणुकीत आमचा (महायुती) विषय झाल्याने ईव्हीएममध्ये घोळ दिसतोय का?, अशी टीका त्यांनी केली.

स्वाराती रुग्णालयास

शैलेद्र चौधरी (रा. मिरा रोड ठाणे) या चौघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या मागे आंतरराज्यीय टोळी असून अनेक राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता देखील फिर्यादीत व्यक्त करण्यात आली आहे. पुढील तपास एपीआय कांबळे करत आहेत.

अजित पवार यांना बेनामी

पवार आणि त्यांच्या कुटुंबाच्या मालमत्ता बेनामी मालकीच्या आरोपाखाली जप्त केल्या. त्याविरोधात अजित पवारांनी याचिका दाखल केली होती. अजित पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांची बाजू मांडणारे वकील प्रशांत पाटील यांनी न्यायाधिकरणासमोर युक्तिवाद केला. न्यायाधीकरणाने आदेशात म्हटले आहे की, सदर प्रकरणात पुराव्यांचा अभाव आहे. सादर केलेल्या पुराव्यांमध्ये कोणताही गैरव्यवहार आढळला नाही. सदर प्रकरणात कोणताही बेनामी व्यवहार दिसत नसल्याचे न्यायाधिकरणाने म्हटले आहे. या मालमत्तेसाठी सर्व व्यवहार कायदेशीर मार्गाने, बँकिंग प्रणालीद्वारे किंवा कायद्याचे पालन करणाऱ्या इतर पद्धतींद्वारे केली गेली होती, असेही न्यायाधिकरणाने नमूद केले आहे. ''अजित पवार, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनी बेनामी मालमत्ता खरेदी करण्यासाठी निधी हस्तांतरित केला नाही,'' असे न्यायाधिकरणाने स्पष्ट केले आणि आरोप फेटाळून लावले.

ही संपती केली होती जप्त

जप्तीची कारवाई झालेल्या संपत्तीमध्ये एक फ्लॅट, गोवा रिसॉर्ट, महाराष्ट्रातील २७ विविधी ठिकाणांवरील जमीन, पार्थ पवार यांचे नरिमन पॉइंट येथील निर्मल बिल्डिंग कार्यालय आणि जरंडेश्वर कारखाना यांचा समावेश आहे. अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर न्यायाधिकरणाचा निकाल आला आहे. त्यामुळे अजित पवार आणि सरकारवर टीकाही केली जात आहे.

ना.खाऊंगा, ना खाने दुंगा याचे काय करायचे – काँग्रेस

आयकर विभागाने जप्त केलेली अजित पवारांची १ हजार कोटींची संपत्ती परत देण्याच्या मुद्द्यावर बोलताना काँग्रेसचे राज्य प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, ना खाऊंगा, ना खाने दुंगा ही भूमिका नरेंद्र मोदींची आहे तिचे काय करायचे. भाजपाबरोबर असलेल्या नेत्यांच्या भ्रष्ट कारभारावर पांघरूण घालण्याचा हा प्रयत्न असल्याची टीकाही यावेळी त्यांनी केली.

आमच्यासोबतही तेच घडले,

आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मते आणि ८ जागा. २०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मते होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मते होती आणि जागा ४ आल्या. पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल. तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ०८ डिसेंबर २०२४

एमकेसीएलच्या वतीने अंबाजोगाईच्या कॉम्पूटर वर्ल्डचा पुरस्काराने गौरव

अंबाजोगाई : महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) च्या वतीने घेण्यात आलेल्या सुंदर व स्वच्छ केंद्र स्पर्धा २०२४'' या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या वार्षिक सभेत अंबाजोगाई येथील प्रा. संतोष मोहिते यांच्या कॅम्पुटर वर्ल्ड ला जिल्ह्यातून द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. एमकेसीएलच्या व्यवस्थापकीय संचालिका वीणा कामथ यांचे हस्ते कंम्पूटर वर्ल्ड चे संचालक संतोष मोहिते यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. गेल्या २० वर्ष्या पासून अंबाजोगाई व परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम घडविण्याचे काम सातत्याने कंम्पूटर वर्ल्डच्या माध्यमातून केले जाते. या मुळे दरवर्षी एमकेसीएल कडून सातत्याने विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. यावेळी महामंडळाचे अमित रानडे, अतुल पतौडी, दीपक पाटेकर विभागीय समन्वयक बालकिशन बलदवा, गजानन कुलथे लोकल लीड सेंटरचे गजानन पांचाळ हे उपस्थित होते.या मिळालेल्या पुरस्काराबद्दल प्रा. संतोष मोहिते यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

खा.सोनवणे व खा.लंके यांनी विशेष प्रयत्न केल्यास घाटनांदूर-श्रीगोंदा रेल्वे मार्गाचा प्रलंबित प्रश्न निश्चित मार्गी लागेल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मागील अनेक वर्षा पासून प्रस्तावित असलेल्या घाटनांदूर श्रीगोंदा या अंबाजोगाई-केज-मांजरसुंबा मार्गे अहिल्या देवी नगर जिल्ह्यातून जाणाऱ्या रेल्वे मार्गाला गती मिळण्या साठी बीडचे खासदार बजरंग सोनवणे व अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी विशेष प्रयत्न केल्यास हा प्रलंबित प्रश्न निश्चित मार्गी लागणार आसून हा प्रकल्प दोन्ही जिल्ह्याच्या विकासासह दळणवळणाच्या व रेल्वे खात्याला आर्थिक उत्पन्न देणारा ठरणार आहे.

मागील अनेक वर्षा पासून घाटनांदूर-श्रीगोंदा या रेल्वे मार्गासाठी या पंचक्रोशीतील लोक आग्रही असून या रेल्वे मार्गाच्या मागणी साठी भाजपचे एकमेव निष्ठावंत कार्यकर्ते भारत पसारकर यांनी अनेक वेळा स्वतःच्या हस्ताक्षरात केंद्र सरकार कडे पाठपुरावा केलेला असून माजी खासदार डॉ प्रीतमताई मुंडे यांच्या कडे अंबाजोगाई जनाग्रह रेल्वे संघर्ष समितीने ही पाठपुरावा केलेला आहे. हा रेल्वेमार्ग पूर्ण व्हावा यासाठी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू अनुकूल होते. या रेल्वेमार्गामुळे अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा, जामखेड या सह अनेक गावे रेल्वेमार्गावर येणार असून २६५ किमी अंतराचा मार्ग पूर्ण झाला तर या परिसरातील नागरिकांना दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत सोयीचे होणार आहे. केंद्रीय रेल्वे मंत्रालयाच्या वतीने सन २०१५ मध्ये अर्थसंकल्प सादर करताना तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनी घाटनांदूर (जि. बीड) ते श्रीगोंदा (जि.अहमदनगर) हा नवीन रेल्वेमार्ग जाहीर करून या मार्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी ३४ लाख रुपयांची तरतूद जाहीर केली होती. त्यानुसार पुढील आठ महिन्यांच्या कालावधीत सन २०१६ मध्ये रेल्वे प्रशासनाने या नियोजित रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणाचे काम घाटनांदूर रेल्वेस्थानकातून सुरू केले. घाटनांदूर व अंबाजोगाई शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतात खुंटे रोवण्यात आले होते.

प्रशासनाची ही सतर्कता पाहिल्याने नागरिकांना हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असे वाटत होते. मात्र, पुढे हे काम रखडले ते आतापर्यंत रखडलेले आहे. घाटनांदूर, अंबाजोगाई, लोखंडी सावरगाव, केज, नेकनूर, मांजरसुंबा, लिंबागणेश, पाटोदा, जामखेड, दौंड किंवा श्रीगोंदा रोड असा हा मार्ग तेव्हा प्रस्तावित करण्यात आला होता. हा रेल्वेमार्ग बीड व अहमदनगर जिल्ह्यातील जनतेच्या विकासाची पर्वणी ठरून आर्थिक सुबत्ता आणणारा ठरू शकतो. बीड जिल्ह्यात उद्योगधंदे वाढीस लागावेत व जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, केज हे तालुके रेल्वेमार्गाने जोडले जावेत या उद्देशाने या रेल्वेमार्गाची मागणी पूर्णत्वाकडे जाणार आहे. परंतु हा रेल्वेमार्ग परळी-अंबाजोगाई-केज-नेकनूर-मांजरसुंबा-पाटोदा जामखेड-अहमदनगर ही अधिक प्रवासी अधिभार देणारी गावे वगळून कमी अधिभार देणाऱ्या परळी-तेलगाव-वडवणी-बीड-अहमदनगर अशा प्रकारे बनवण्यात येत आहे. त्यामुळे आता सन २०१६ मध्ये झालेल्या सर्वेक्षणाच्या आधारे घाटनांदूर ते श्रीगोंदा या रेल्वेमार्गाचे काम मार्गी लागावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

शालेय क्रीडा स्पर्धेबाबत सोमवारी बैठक

बीड । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा संघटनांची सोमवारी (ता.०९) दुपारी एक वा. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सबंधित खेळ संघटनांच्या प्रमुखांनी कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

आष्टे डू आखाडा, युनिफाईट, कुडो, स्पीडबॉल, टेंगसुडो, फिल्ड आर्चरी, सुपर सेव्हन क्रिकेट, बेल्ट रेसलिंग, टेनिस व्हॉलीबॉल, लगोरी, बीच व्हॉलीबॉल, टेनिस क्रिकेट, टेबल सॉकर, ग्रॅपलिंग, पॅन्टाक्यु, लंगडी, स्पोर्ट डान्स, संगीत खूर्ची, मॉन्टेक्स बॉल क्रिकेट, मिनी गोल्फ, फ्लोअर बॉल, थायबॉक्सिंग, हाफकिडो बॉक्सिंग, वुडबॉल, पॉवर लिफ्टिंग, टॉर्गेट बॉल, कॉर्फबॉल, ड्रॉपरो बॉल, चॉकबॉल, फुटबॉल टेनिस, वुडो, रोपस्किपींग, सिलंबम, थांग ता मार्शल आर्ट, कुराश, रस्सीखेच, जीत कुने दो, हुप क्वांन दो, युग मुन दो, वोवीनाम, जंप रोप, टेनिस बॉल क्रिकेट आदी खेळ संघटनांच्या प्रमुखांनी आवश्यक माहिती विहित वेळेत सादर केल्यानंतरच संबधित खेळाच्या जिल्हास्तर, विभागस्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन निश्चित करण्यात येणार आहे.

खेळाच्या अधिकृत राज्य संघटनेची जिल्हा संघटनेला मान्यता असल्याचे पत्र, धर्मादाय आयुक्त यांच्याकडील प्राप्त संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संघटनेच्या कार्यकारणीची यादी त्यांच्या पत्ता आणि संपर्क क्रमांकासह, खेळाबाबतची माहिती जसे खेळ सांघिक आहे, की वैयक्तिक, खेळाडू संख्या वजनगट, खेळाची नियमावली व इतर आवश्यक माहिती, जिल्हास्तर स्पर्धेचे आयोजन स्वबळावर (तांत्रिक आणि आर्थिक) करण्यास तयार असल्याचे हमीपत्र आदी कागदपत्रे खेळ संघटनांच्या प्रमुखांनी बैठकीस येताना सोबत आणावे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

संकल्प विद्यामंदिर येथे महापरिनिर्वाण दिन विविध उपक्रमाने संपन्न

महापरिनिर्वाण दिनानिमित्त, आपण सर्वांनी त्यांच्या आदर्शांवर चालून समाजातील प्रत्येक व्यक्तीला समानता, न्याय आणि बंधुतेच्या मार्गावर पुढे नेत जावं, हीच खरी श्रद्धांजली -मुख्याध्यापिका बडे

अंबाजोगाई प्रतिनिधी

आज संकल्प विद्या मंदिर येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर.एस. तर प्रमुख अतिथी म्हणून सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती कुलकर्णी मॅडम तसेच ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती शिंदे मॅडम यांची मंचावर उपस्थिती होती. प्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सर्व शिक्षक विद्यार्थी यांनी अभिवादन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी अगदी उत्कृष्ट इंग्रजी ,हिंदी, मराठी भाषेमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.आजचा दिवस सहा डिसेंबर भारतीय समाजाच्या ऐतिहासिक दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा आहे. डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, आपण सर्वांनी त्यांच्या आदर्शांवर चालून समाजातील प्रत्येक व्यक्तीला समानता, न्याय आणि बंधुतेच्या मार्गावर पुढे नेत जावं, हीच खरी श्रद्धांजली. होईल असे मत मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर.एस. यांनी अध्यक्षीय समारोप करत असताना व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजना इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी केले होते यांना वर्ग शिक्षकास श्रीमती नायक पि. एच. यांचे मार्गदर्शन लाभले. तर उत्कृष्ट कार्यक्रमाचे नियोजन ,आयोजन केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका व विभाग प्रमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना लेखणी देऊन कौतुक केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. श्रेयश लोमटे, कु. सानिध्या स्वामी या विद्यार्थ्यांनी केले तर आभार कु.आरोही बनाळे या विद्यार्थिनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंद विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

पाटोदा : ईपीएस १९९५ पेन्शनधारक संघटना व महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने पाटोदा येथे दि.७ डिसेंबर रोजी बैठक घेऊन ह.भ.प. राधाताई महाराज यांना पुष्पहाराने सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष जगन्नाथ मामडगे, डॉ. संजय तांदळे, शिवाजीराव शिंदे, संतोष गर्जे आदींची उपस्थिती होती.

नांदेवाली येथे खंडोबाच्या यात्रे निमित्त आज कुस्त्यांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नांदेवाली येथे मार्गशीर्ष महीण्यात दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी ग्राम दैवत आसलेले मार्तंड भैरवनाथ खंडोबारायची यात्राउत्सव चंपाषष्ठी स्कंदषष्ठी निमित्त दोन दिवस यात्राउत्सव आयोजन करण्यात येत आसतो त्या निमित्त रविवार(ता.८)रोजी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले असून त्या साठी नामांकित मल्ल हजेरी लावणार आहेत.

गावा मधे ग्रामस्थांकडून खंडोबा दैवताचे भव्यदिव्य मंदिर उभारण्यात आले आसुन यात्रा उत्सव निमित्त मंदिर परीसरात विधुत रोषणाई करण्यात आली आहे यात्रा उत्सव दोन दिवस साजरा करण्यात येत आसतो शनिवार (ता.७) रोजी गावातील घराघरात खंडोबाला नैवेद्य अर्पण करून तळी भंडाऱ्याचे प्रथा पारंपरिक प्रथेनुसार करण्यात आली त्यानंतर वांगे कांदे खाण्यास ग्रामस्थांकडून सुरुवात करण्यात येत आसते संध्याकाळी खंडोबा दैवताचे संपुर्ण गावात वाजत गाजत मिरवूनक काढून उत्सव साजरा करण्यात संध्याकाळी वाघ्या मुरूळीचे गाण्याचा कार्यक्रम साजरा होत आसतो. आज रविवार (ता.८) रोजी यात्रा उत्सव निमित्त कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे.या यात्रा निमित्त गावातील बाहेर गेलेले ग्रामस्थ यात्रा उत्सव साठी उपस्थित राहात आसताता. या यात्राउत्सव साठी उपस्थित राहावे आसे अवाहान ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

राष्ट्रनिर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात जवळपास ६०० संस्थांने अस्तित्वात होती. ती एकत्र करून एकसंघ राष्ट्र तयार करण्याऐवजी भारत तुकड्या तुकड्यांमध्ये विभाजित होऊन या सर्वांमध्ये कायमची दुही निर्माण होईल अशी ब्रिटिशांची योजना होती . त्यातूनच त्यांनी येथील जनतेच्या व नेत्यांच्या मनात फाळणीचे विषयुक्त विचार पेरले. मात्र अशा गुंतागुंतीच्या कालखंडात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावत येथील आर्थिक समानता, सामाजिक न्याय, बंधूता इत्यादी शाश्वत मूल्यांच्या आधारावर संविधानाची निर्मिती केली आणि भारताची अखंडता टिकून टिकवून ठेवली. त्यामुळे राष्ट्रनिर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान आहे. असे प्रतिपादन इतिहासाचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले.

ते येथील खोलेश्वर महाविद्यालयातील अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा. शि. प्र. संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा निवृत्त मुख्याध्यापक आप्पाराव यादव यांची उपस्थिती होती तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. दीपक फुलारी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आनंद पाठक व अभ्यास मंडळाचे प्रमुख प्रा. गौतम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ.रोडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय हालाखीच्या परिस्थितीत संघर्ष करीत परिस्थितीवर मात केली .त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आजही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरतील असेच आहेत.

संविधान आपल्या राष्ट्राचा आत्मा आहे. डॉ. आंबेडकरांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून आपल्या देशाचे संविधान तयार केले आहे. सामाजिक व आर्थिक न्याय, समता, बंधुता व मानवता आदि मूल्य रुजली पाहिजेत व टिकली पाहिजेत यासाठी संविधानात त्यांचा अंतर्भाव केला. त्यामुळेच खऱ्या अर्थाने आजही आपण आपले एकसंघत्व टिकवून ठेवू शकलो आहोत. डॉ.आंबेडकरांचे जीवन म्हणजे संघर्षाची गाथाच आहे. जीवनभर त्यांना त्यांना संघर्ष करावा लागला. त्यामुळेच तळागाळातील जनतेचे दुःख ते समजू शकले व या जनतेला ते न्याय मिळवून देऊ शकले आणि ते त्यांचे उद्धारकर्ते ठरले. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी बाबासाहेबांचे संपूर्ण जीवन हे प्रेरणादायी आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना आप्पाराव यादव म्हणाली की, प्राचार्य डॉ. रोडे सरांनी त्यांच्या व्याख्यानातून बाबासाहेबांचे संपूर्ण चरित्रच आपल्यापुढे उभे केले .खरोखरच तुम्हा सर्वांसाठी ते अतिशय प्रेरणादायी आहे. यातून नक्कीच आपण प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल करू असा आशावाद व्यक्त करून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आयुष्यभर संघर्ष करावा लागला. या संघर्षातून ते घडत गेले. देशात सामाजिक समता निर्माण करून त्यांनी येथील जनसामान्यांचे जीवन उंचावले म्हणूनच ते महामानव ठरले. अशा महामानवांचे विचार आपण वाचले पाहिजेत विशेष म्हणजे ते लक्षात ठेवून त्याप्रमाणे आचरण करण्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनीही महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. ते एक दृष्टे चिंतक होते. भारताची आज जी प्रगती आपण अनुभवत आहोत ती बाबासाहेबांच्या चिंतनाच्या अधिष्ठानावर झालेली आहे. असे मत व्यक्त करून त्यांनी बाबासाहेबांच्या ऐतिहासिक विचारांचा मागोवा घेतला.व्याख्यानानंतर भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या संगीत विभागाचे प्रमुख प्रा. शैलेश पुराणीक , प्रा. महादेव माने, कु.नंदिनी कुलकर्णी, कु. क्रांती एडके आदींनी भीम गीते सादर केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. गौतम गायकवाड यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. जिजाराम कावळे तर आभार प्रा. डॉ.देविदास खोडेवाड यांनी मानले. कार्यक्रमाचा प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

पान ६ वरून...

मुलींनी घेतली एचआयव्ही

हवास करतो पण त्याचे आरोग्य कार्ड न तपासताच त्याच्यासोबत आपण विवाह करतो असं न करता प्रत्येक मुलीने विवाह करण्यापूर्वी समोरील मुलाची किंवा मुलाचा एचआयव्ही तपासणी रिपोर्ट इतर सर्व आजाराची तपासणी अहवाल करूनच त्याच्यासोबत विवाह करावा असे आव्हान करण्यात आले यानंतर उपसस्थीत मुलींनी अतिशय चांगल्या प्रतिसाद देत मुलींनी असे सांगितले की सर आम्ही जेव्हा आमचे विवाह होतील ते एचआयव्ही तपासणी किंवा इतर तपासण्या केलेल्या असलेल्या मुलासोबतच करू असा मुलींनी शपथ घेतली यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्य अखीला गोस मॅडम यांनी अध्यक्षीय समारोप केला करताना त्यांनी सांगितलं की महाविद्यालयाच्या वतीने मागील तीन-चार वर्षांपासून रेट रिबीन क्लबच्या माध्यमातून असंख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्यासाठी आम्ही धनराज पवार सरांचे आभार व्यक्त केले त्यांनी असे कार्यक्रम आमचा कॉलेज चालु करून दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले त्यानंतर आभार प्रदर्शन काशीद सरांनी केले त्यानंतर मुलींना अल्पोपहार देऊन त्या उपस्थित मुलांनी आपले स्वतःची एचआयव्ही तपासणी करून घेतली या कार्यक्रमाविषयी करण्यासाठी रेखा बनसोडे विमल तरकसे या पण उपस्थित होत्या घेतले व इतर कर्मचारी उपस्थित होते.

माजी मंत्री जयदत्त

उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक विजयकुमार दगडे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी अशा दोन गटात स्पर्धा घेण्यात आल्या. शनिवार दि.७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात रक्तदात्यांनी व पालकांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.केशव भांगे यांनी आण्णा साहेबांच्या राजकीय, सामाजिक, सहकार व शैक्षणिक कार्याविषयी माहिती सांगितली.

यावेळी अरूण डाके, अच्युत मोरे, हनुमान जगताप, मारूती वाघ, अनिल बहिर, ज्ञानेश्वर केंडे, जानबा पवार, शिवाजी गवळी, नवनाथ बहिर यांच्यासह विद्यार्थी, पालकांची उपस्थिती होती.

बारा बलुतेदारांना सोबत

सरकारच्या काळात त्यांनी महसूल व पुनर्वसन सह अनेक खात्याचे राज्य मंत्रीपद सुद्धा भूषविले आहे.त्यांनी मंत्रिपदाच्या काळात अतिशय उत्तम असे काम केलेले आहे. याच दरम्यान उत्तराखंडमध्ये आलेली पूर परिस्थिती असो की मतदार संघात पडलेला दुष्काळ असो आ.धस यांनी आपल्या कौशल्याचा वापर करून ही परिस्थिती उत्तमपणे हाताळली होती.मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांचे प्रश्न असो की,पाणी प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला प्रश्नसुद्धा आ.सुरेश धस अण्णांनी वेळोवेळी पोटतिडकेने

सभागृहात मांडलेला आहे.विशेष म्हणजे कोरोना महामारीच्या काळातसुद्धा महाराष्ट्रात सर्वात जास्त कोविड सेंटर आ.धस अण्णांनी चालविले आणि त्यातून हजारो लोकांना या महाभयंकर संकटातून वाचविले होते.आ.सुरेश धस यांची ग्रामीण भागातील जनतेशी अतिशय घट्ट अशी नाळ जुळली आहे हे कालच्या निकालावरून सिद्ध

होते.मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रश्नांचा त्यांना अत्यंत बारकाईने अभ्यास आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीने जनसामान्यांच्या मताचा आदर करीत सुरेश धस यांना योग्य ते स्थान द्यावे अशी मागणी आ.धस यांचे कट्टर समर्थक आष्टी नगर पंचायत चे माजी नगरसेवक तथा नाभिक संघटनेचे नेते प्रविण कदम यांनी केली आहे.

दत्त जयंती निमित्त

१३ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. विनायक महाराज, पंढरपुरकर, तर १४ डिसेंबर दत्त जयंती दिवशी सकाळी दहा ते बारा या वेळेमध्ये श्री.ह.भ.प. शिवाजी महाराज म्हस्के यांचे किर्तन होईल तर संध्याकाळी श्री.ह.भ.प. हनुमान महाराज डांबे यांचे कीर्तन होईल तसेच काल्याचे किर्तन १५ डिसेंबर रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेमध्ये वा.श्री. ह.भ.प. भगवान महाराज मोरे, वरपगावकर यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन झाल्यानंतर लागलीच महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तरी या आठ दिवस चालणाऱ्या कीर्तन महोत्सवाचा धारूर शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आव्हान दत्त जयंती उत्सव समितीने केले आहे.

बेलगावच्या शालेय व्यवस्थापन

खंडागळे यांची निवड झाली आहे. या नवनियुक्त पदाधिका-याचे आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस,युवा नेते जयदत्त धस,सागर धस, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,एन.टी.भाऊ गर्जे,माजी पं.स.सदस्य किरण पोकळे,अँड.राकेश हंबर्डे,अँड.महादेव मोहिते,सरपंच तात्यासाहेब शिंदे,माजी सरपंच बन्सी भाऊ पोकळे,मोहन पोकळे, माजी उपसरपंच संजय पोकळे, माजी सरपंच संजय पोकळे,उपसरपंच सतीश पोकळे,अध्यक्ष प्रविण पोकळे,पत्रकार रघुनाथ कर्डीले,गणेश दळवी,सचिन रानडे,शरद रेडेकर,बाळासाहेब पोकळे,कृष्णा पोकळे,मनोज पोकळे, भाऊसाहेब पोकळे,ज्ञानदेव पोकळे, रामहरी पोकळे, संभाजी पोकळे,मारुती सरोदे,राजू खंडागळे, अंबादास पोकळे आदिंनी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

देशातील पोल्ट्री व्यवसायिकांना मिळणार दिलासा

केंद्र सरकारकडून ॲक्शन प्लॅन तयार

पुणे : गेल्या दोन वर्षांत अनेक नवीन देश भारतात अंडी खरेदी करण्यासाठी आले आहेत. अनेक मोठ्या कारणांमुळे परदेशात भारतीय अंड्यांना पसंती दिली जात आहे. विशेषतः रशिया-युक्रेन युद्धानंतर अशा ग्राहकांची संख्या सातत्याने वाढत आहे. पण खेदाची गोष्ट म्हणजे निर्यातीसाठी ही अंडी खरेदी नमक्कल, (तामिळनाडू), आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि तेलंगणा या काही राज्यांतूनच केली जाते. यापैकी, बहुतेक खरेदी केवळ नमक्कलमधूनच केली जाते. हे लक्षात घेऊन केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाने एक उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत रोगमुक्त कंटेनमेंट झोन तयार करण्याची तयारी सुरू आहे.

अनेक राज्यांमध्ये कंटेनमेंट झोन आधीच तयार करण्यात आले आहेत. आणि हे सर्व अंड्याची निर्यात वाढवण्यासाठी होत आहे. एक-दोन नव्हे तर अनेक राज्यांना याचा फायदा होणार आहे.

दक्षिण भारतातून अंडी निर्यात होत असतील तर राजस्थान, पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील पोल्ट्री उत्पादकांनाही त्याचा मोठा फायदा होईल, असाही विचार केला जाऊ शकतो. देशात दररोज सुमारे २५ कोटी अंड्यांची खरेदी-विक्री होत असल्याचे उल्लेखनीय आहे. गेल्या वर्षी देशात १४ हजार कोटी अंड्यांचे उत्पादन झाले होते.दक्षिण भारतातील अनेक राज्ये, विशेषत: नमक्कल, (तामिळनाडू), आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सर्व ईशान्येकडील राज्यांना अंडी पुरवतात. अशा परिस्थितीत, येथून जरी अंडी निर्यात होत असली, तरी ईशान्येकडील आसाम, मेघालय, त्रिपुरा, नागालँड आणि मणिपूर इत्यादी राज्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी वर नमूद केलेल्या पाच राज्यांमधून अंडी खरेदी केली जातील. अंडी खरेदी केल्यावर दरही वाढतील. यामुळेच डिसेंबर-जानेवारीच्या हंगामात मलेशिया भारतातून अंडी खरेदी करत असताना अंड्यांची किंमत सहा रुपयांवर पोहोचली होती. अनेक मोठ्या बाजारात दर ६ रुपयांच्या पुढे गेले होते. आता श्रीलंकाही मोठ्या प्रमाणावर अंडी खरेदी करत आहे. अनेक आखाती देशांमध्ये आधीच अंडी पुरवली जात आहेत.

काळ्या रंगाची गाजराची शेती देते अधिक फायदा

आपण आजपर्यंत लाल रंगाची गाजरं पाहिली आणि त्याची शेतीही केली असेल. सध्या काळ्या गाजराच्या शेतीकडे बरेच लोक वळताना दिसत आहे. काळ्या गाजराची लागवड करून शेतकरी चांगला नफा कमवू शकतात. तसेच त्याची लागवड करणेही खूप सोपे आहे. कृषी शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, काळ्या रंगाची गाजरे ही जंगली असतात. ज्या शेतात पाण्याचा निचरा करण्याची योग्य व्यवस्था असेल तेथे शेतकरी ही शेती करू शकतात. पुसा, कृष्णा ही त्याची सर्वोत्तम जात आहे. ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात याची लागवड करता येते. ३ ते ४ महिन्यांत पीक तयार होते.

काळे गाजर आरोग्यासाठी फायदेशीर : काळ्या गाजरामध्ये व्हिटॅमिन ए, बी, सी आणि ई मुबलक प्रमाणात आढळते. यासोबतच काळ्या गाजरात लोह, तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस सारखे घटक आढळतात. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासोबतच ते मधुमेह, उच्च साखरेची पातळी आणि डोळ्यांचे आजार बरे करण्यास देखील मदत करते. काळ्या गाजरांमध्ये फायटोकेमिकल्ससारखे घटकही आढळतात. याचे दररोज सेवन केल्याने तुम्हाला कॅन्सरचा धोका कमी जाणवतो. शरीर निरोगी ठेवण्यासाठी काळे गाजर रोज खावे. भाजीपाला, लोणचे, जाम, कोशिंबीर, ज्यूस, पुडिंग किंवा इतर गोड पदार्थ त्यापासून बनवले जातात. हे कच्चे देखील खाऊ शकता.

झाडावरील केळीचे घड पिशवीने झाकण्यामुळे होतात आश्चर्यकारक फायदे!

केळी उत्पादक शेतकरी केळीचे घड पिशव्यांनी झाकतात. ही एक सामान्य कृषी पद्धत आहे ज्यामुळे फळांचे विविध पर्यावरणीय घटक, कीटक आणि रोगांपासून संरक्षण होते. सामान्यत: या पिशव्या पॉलिथिन, न विणलेले फॅब्रिक किंवा कागदासारख्या सामग्रीपासून बनविलेले असतात. केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने अनेक फायदे मिळतात. आधुनिक केळी शेतीमध्ये ही एक आवश्यक क्रिया आहे. केळीचे घड पिशवीने झाकण्याचे अनेक फायदे आहेत.

कीटक आणि रोगांपासून संरक्षण : केळीचे घड पिशवीत ठेवण्याचे मुख्य फायदे म्हणजे ते विविध कीटक आणि रोगांपासून संरक्षण प्रदान करते. फुलकिडी, फळमाशी आणि इतर कीटक यांसारख्या कीटकांमुळे केळीच्या फळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, ज्यामुळे चट्टे, डाग आणि इतर गुणवत्तेच्या समस्या निर्माण होतात. तसेच या किडी आणि रोगांना पिशव्या अडथळा म्हणून काम करतात, ज्यामुळे या कीटकांना फळांपर्यंत पोहोचण्यापासून प्रतिबंध होतो. आर्द्र वातावरणात जेथे करपा आणि सिगार रॉट सारख्या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो. बॅगिंगमुळे एक सूक्ष्म वातावरण तयार होते जे फळांच्या पृष्ठभागाशी ओलावा कमी करते, ज्यामुळे अशा रोगांचे प्रमाण कमी होते. यामुळे रासायनिक कीटकनाशकांची गरज कमी होते, त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. सुरक्षित, कीटकनाशकमुक्त फळ उत्पादित होते. याव्यतिरिक्त, पावसाळ्यात फळांना पिशव्या मातीच्या कणांपासून दूषित होण्यास प्रतिबंध होते.

फळांची चांगली गुणवत्ता : केळीची गुणवत्ता वाढवण्यात बॅगिंग महत्त्वाची भूमिका बजावते. पिशव्या धूळ, घाण आणि यांत्रिक नुकसान यासारख्या बाह्य घटकांपासून फळांचे संरक्षण करतात. परिणामस्वरुप, केळी गुळगुळीत त्वचेसह एकसमान आकार विकसित करतात, त्यावर कोणतीही खूण किंवा डाग नसतात. निर्यातक्षम केळीसाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. केळीची गुणवत्ता हा बाजारभावाचा एक महत्त्वाचा निर्धारक आहे. याव्यतिरिक्त, पिशव्या सूर्य प्रकाशामुळे होणारी सन बर्निंग कमी करण्यास मदत करते, थेट सूर्यप्रकाशापासून फळांचे संरक्षण करून, बॅगिंग केळीचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवते, ज्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. त्यामुळे शेतकर्यांना बाजारात जास्त भाव आणि अधिक नफा मिळतो.

फळांची चांगली वाढ आणि परिपक्वता : केळीचे घड पिशव्यांमध्ये पॅक केल्याने फळांच्या सभोवतालच्या सूक्ष्म वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे फळांची वाढ, आकार आणि परिपक्वता चांगली राहते. पिशव्या फळांच्या सभोवतालच्या ओलाव्याची योग्य पातळी राखण्यास मदत करतात, जे फळ भरण्यासाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. हे नियंत्रित वातावरण फळांचे वजन आणि आकार सुधारू शकते, ज्यामुळे प्रति घड जास्त उत्पादन मिळते. शिवाय, बॅगिंगमुळे केळी मजबूत होतात आणि त्यांचे शेल्फ लाइफ वाढते, जे स्थानिक बाजारपेठ आणि निर्यात दोन्हीसाठी फायदेशीर आहे.

काढणी नंतरचे नुकसान कमी करणे : काढणीनंतर, विशेषतः हाताळणी, वाहतूक आणि साठवण दरम्यान केळीचे लक्षणीय नुकसान होते. कापणीपूर्व अवस्थेत बॅगिंगमुळे संरक्षणाचा अतिरिक्त थर देऊन हे नुकसान कमी करण्यात मदत होते. फळांचा दर्जा चांगला आणि नुकसानीचा प्रादुर्भाव कमी होतो. म्हणजे पॅकिंग अवस्थेत आणि वाहतुकीदरम्यान कमी फळे खराब होतात. याव्यतिरिक्त, बॅगिंगमुळे पिशव्या फळांमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतात. त्यामुळे फळांचे वजन कमी होत नाही. उच्च तापमान असलेल्या भागात किंवा कोरड्या हंगामात जेव्हा निर्जलीकरणाचा धोका जास्त असतो तेव्हा हे विशेषतः महत्त्वाचे आहे.हवामानास अनुकुल : अतिवृष्टी किंवा जोरदार वारा यांसारख्या परिस्थितीत, बॅगिंगमुळे फळांच्या घडांना अतिरिक्त संरक्षण मिळते. पिशव्या गारपीट, मुसळधार पाऊस आणि काही बाबतीत पानांमुळे होणारे नुकसान कमी करण्यास मदत करतात. यामुळे हवामानातील बदलांशी जुळवून घेण्यासाठी आणि बदलत्या हवामानाच्या पद्धती असूनही सातत्यपूर्ण उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी बॅगिंग हा एक मौल्यवान उपाय आहे.

हळद पीक व्यवस्थापन

हळद लागवड होऊन सात महिन्यांचा कालावधी (२१० दिवस) पूर्ण झाला आहे. या कालावधीमध्ये पिकामध्ये हळकुंड भरणे ही महत्त्वाची अवस्था सुरु झालेली असते. या अवस्थेत हळकुंडाची जाडी आणि वजन वाढण्यास मदत होत असते. नव्याने आलेल्या फुटव्यांपासून हळकुंड भरण्याचा हा कालावधी असतो. यावेळी वातावरणात साधारणपणे १८ ते २० अंश सेल्सिअस तापमान असते. प्रकाश संश्लेषण क्रियेतून पानांत तयार झालेले अन्न खोडाद्वारे हळकुंडापर्यंत पोहोचत असते. अशावेळी पाने निरोगी राहणे गरजेचे असते.हळद पिकाच्या योग्य वाढीसाठी सद्य:स्थितीत आंतरमशागतीची कामे वेळेवर करणे गरजेचे आहे. यामध्ये खते देणे, पाणी व्यवस्थापन, तण नियंत्रण, फुलांचे दांडे न काढणे इत्यादी महत्त्वाच्या कामांचा समावेश होतो. जर तापमान फारच कमी झाले, तर हळद पिकांवर विविध कीड-रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. परिणामी गड्ड्यांची संख्या आणि आकार यावर परिणाम होतो. अशावेळी हळद पिकाचे योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

आंतरमशागत (भरणी करणे) : हळद पिकाला मातीची भर लावलेली नसेल, तर फुटव्यांपासून नव्याने आलेले हळकुंड उघडे राहतात. हळकुंड सूर्यप्रकाशात सान्निध्यात आल्यास ते हिरवे पडतात आणि वाढ खुंटते. उघड्या राहिलेल्या हळकुंडावर किंवा गड्ड्यांवर कंदमाशी सारख्या किडी अंडी घालतात. त्यामुळे कंदकुज रोगाचा प्रसार होतो. त्यासाठी तत्काळ मातीची भर लावून हळकुंडे पूर्णपणे झाकून घ्यावीत. त्यामुळे हळकुंडांचे चांगले पोषण होऊन चांगली पोसली जातात. हळदीच्या दोन्ही गड्ड्यांमधील मोकळ्या जागेमधील माती १.५ ते २ इंच शिपीच्या कुदळीने खणून दोन्ही बाजूंच्या गड्ड्यांना लावणे म्हणजेच भरणी करणे. भरणी केल्यामुळे नवीन येणारे हळकुंडे झाकले जाऊन त्यांची चांगली वाढ होते. योग्यवेळी भरणी केल्यामुळे एकूण उत्पादनामध्ये साधारणपणे १० ते १५ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. गादी वाफ्यावर भरणी करताना पॉवर टिलरच्या साह्याने किंवा दोन गादीवाफ्यांमधील जागेतील माती मोकळी करून गादीवाफ्यावर भर द्यावी. पॉवर टिलरद्वारे भरणी केल्यामुळे मजुरी खर्चात बचत होते. गादीवाफ्यावर ठिबक सिंचन केले असल्यास, भरणी करताना ड्रीपर मातीखाली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

खत व्यवस्थापन : शाकीय वाढ पूर्ण झाल्यानंतर हळद पिकास कोणतीही नत्रयुक्त रासायनिक खते जसे युरिया देऊ नये. नत्रयुक्त खते दिल्यामुळे पिकाची अतिरिक्त शाकीय वाढ होते. परिणामी हळद पिकाची पुढील अवस्था जसे हळकुंड भरणे, हळकुंडाची जाडी आणि वजन वाढणे लांबणीवर पडते. ज्या ठिकाणी पोटॅशयुक्त खतांची कमतरता असेल, तेथे हेक्टरी १२५ किलो पांढरा पोटॅश द्यावा. त्यामुळे हळकुंडांचे वजन वाढून हळकुंडांना चकाकी येते.

सिंचन व्यवस्थापन : पावसाळा सुरू झाल्यानंतर पावसाचे पाणी जमिनीमध्ये साठून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकामध्ये पाणी साठून राहिले तर मुळांना हवा (ऑक्सिजन) घेण्यास अडथळा निर्माण होतो. परिणामी हळदीची पाने पिवळी, निस्तेज होऊन मलूल होतात. त्यासाठी पिकामध्ये साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा तत्काळ निचरा करावा. वाकोऱ्याची शेवटची सरी कुदळीच्या साह्याने फोडून पाणी काढून द्यावे. जमिनीतील ओलावा अभ्यासून पाणी देण्याचे नियोजन करावे. रुंद वरंबा पद्धतीने लागवड असल्यास ठिबक सिंचनाचा अवश्य उपयोग करावा. ठिबक सिंचनाच्या वापरामुळे पाण्याचा अपव्यय टाळला जाऊन जमिनीचे जैविक गुणधर्म सुधारण्यास मदत होते. परिणामी जमिनीमध्ये मुळांच्या भागांत वाफसा लवकर आणि जास्त प्रमाणात तयार होतो. त्यामुळे सूक्ष्मजिवांच्या क्रिया सुधारतात, मातीची सच्छिद्रता वाढते, जलधारणक्षमता वाढते, जमिनीची उत्पादनक्षमता वाढते. अन्नद्रव्यांचे वहन सुलभ होऊन हळद पिकांच्या मुळाद्वारे शोषण अधिक होते. सूक्ष्म पाने लवकर मोठी होतात. एकूण पीक उत्पादनात वाढ होऊन हळदीचा मुख्य गुणवत्ता घटक असलेल्या कुरकुमीन प्रमाण वाढण्यास मदत होते.

ठिबकद्वारे सिंचन करताना दोन लॅटरमधील अंतर ४ ते ५ फूट ठेवावे. दोन तोट्यांमधील अंतर जमिनीच्या प्रतीनुसार ठेवावे. रेताड जमिनीमध्ये तुषार किंवा ठिबक सिंचनाचा उपयोग अत्यंत उपयुक्त ठरतो. जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. त्यामुळे सतत ओलावा राहून हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. हिवाळ्यामध्ये पाण्याच्या दोन पाळ्यांमधील अंतर १२ ते १५ दिवस ठेवावे. पाऊस समाधानकारक असेल, तर हलक्या ते मध्यम प्रतीच्या जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात. शिफारशीत मात्रेपेक्षा कमी पाणी पिकास मिळाल्यास कंदांची योग्य वाढ होत नाही. प्रक्रियेनंतर अशा हळकुंडांचा रंग फिका पडतो, चमक घटते. परिणामी विक्रीवेळी कमी दर मिळतो.

फुलांचे दांडे न काढणे : शाकीय वाढ पूर्ण झाल्यानंतर हळदीला फुले येण्यास सुरुवात होते. काही जातींना अधिक, तर काही जातींना कमी प्रमाणात फुलांचे दांडे येतात. हळदीला फुले येणे म्हणजे शाकीय वाढीचा कालावधी संपून कंद सुटण्यास सुरुवात झाल्याचे लक्षण आहे. फुलांचे दांडे तसेच झाडावर ठेवल्यास हळद पिकाला त्याचा कोणताही तोटा होत नाही. फुलांचे दांडे काढणे हे काम खर्चीक आहे. संशोधनातील प्रयोगांती असे निदर्शनास आले आहे, की हळदीवर फुलांचे दांडे असल्यामुळे उत्पादनात कोणतीही घट येत नाही. तसेच फुलांचे दांडे येणे ही न संपणारी क्रिया आहे. एकदा जरी दांडे काढले, तरी ते नव्याने येतच राहतात. फुले काढताना हळद पिकाच्या खोडाला इजा झाली, तर त्या भागातून दुय्यम बुरशींचा शिरकाव पिकात होऊन कंदकुज रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे हळद पिकास आलेली फुले तशीच राहू द्यावीत.

तण नियंत्रण : हळद पिकामध्ये शेणखताचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यामुळे शेणखतातून तणांचे बी शेतात येते. अवकाळी पाऊस झाल्यास, हे तणांचे बी मोठ्या प्रमाणात उगवून येते. या तणांचे वेळीच नियंत्रण होणे गरजेचे असते. तणांच्या तीव्रतेनुसार मजुरांच्या मदतीने निंदणी करून घ्यावी. तणनाशक फवारणी करणे टाळावे. तणनाशकाची फवारणी केली तर हळद पिकाच्या शारीरिक क्रियांवर विपरीत परिणाम होतो. तसेच उत्पादनात घट येण्याची शक्यता असते.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७४० : दीड वर्षाच्या लढाईनंतर रेवदंड्याचा किल्ला मराठ्यांनी पोर्तुगीजांकडून जिंकला. मानाजी आंग्रे आणि खंडोजी मानकर यांच्या नेतृत्वाखाली मराठी आरमाराने हा विजय मिळवला.
१९२३ : अमेरिका आणि जर्मनी मध्ये मित्रासंधी होऊन हस्ताक्षर झाले होते.
१९३७ : भारतीय पहिली दुमजली बस मुंबईत धावू लागली.
१९४१ : दुसरे महायुद्ध - जपानी फौजांनी एकाच वेळी मलेशिया, थायलँड, हाँगकाँग, फिलिपाइन्स व डच इस्ट इंडिज वर हल्ला केला. याच्या एकच दिवस आधी जपानने अमेरिकेतील पर्ल हार्बरवर हल्ला चढवला होता.
१९५५ : युरोप परिषदेने युरोपचा ध्वज अवलंबला.
१९५६ : ऑस्ट्रेलियाच्या मेलबर्न येथे ऑलंपिक खेळांचा समारोप झाला.
१९६७ : आयएनएस कलवारी भारतीय नौदलात समाविष्ट करण्यात आले.
१९७१ : भारत पाक युद्ध भारतीय आरमाराने पाकिस्तानातील कराची बंदरावर हल्ला केला.
१९७६ : अमेरिका ने नेवादा येथे अणुबॉम्ब चाचणी केली होती.
१९८० : इंग्रजी संगीतकार जॉन लेलेन यांना त्यांच्या घराबाहेर एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर गोळीबार केला.
१९८५ : सार्क परिषदेची स्थापना.
१९९८ : कर्नल ह्यूगो शावेज यांनी व्हेनेझुएला चे राष्ट्रपती म्हणून पदभार सांभाळला.
१९९८ : ऑलंपिक च्या इतिहासात महिलांचा बर्फावर खेळल्या जाणारा हॉकी खेळाला खेळल्या गेले.
१९९८ : फिनलँड ने स्वीडन ला ६-० ने बर्फावरील खेळल्या जाणाऱ्या हॉकी मध्ये हरवले होते.
२००० : ब्रिटन आणि रशिया या दोन देशांत सुरक्षा करार पार पडला.
२००३ : जेव्हा राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये निलंबना चा काळ वाढविल्यामुळे झिंबाब्वे ने स्वतःला वेगळे करून घेतले.
२००३ : वसुंधरा राजे ह्या राजस्थान च्या मुख्यमंत्री बनल्या.
२००३ : उमा भारती ह्या मध्य प्रदेश च्या मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्या.
२००४ : पाकिस्तान ने ७०० किलोमीटर दूर मारा करणारी शाहीन-१ नावाच्या क्षेपणास्त्राचे यशस्वी रित्या परीक्षण केले.
२००४ : रवींद्रनाथ टागोर यांच्या चोरीस गेलेल्या नोबेल पदकाची प्रकृतीची स्वीडन सरकारने भेट दिली.
२००४ : ख्रिश्चन ज्युनियर या फुटबॉलपटूच्या मृत्यूस कारण ठरलेल्या मोहन बागानचा गोळी सुब्रतो पॉलवर बंदी.
२००७ : अमेरिकी संघटना ने दक्षिणी अफगानिस्तान च्या मुसाकला जिल्ह्यात असलेल्या तालिबानी आतंकवाद्यांवर हल्ला केला होता.
२०१६ : इंडोनेशियातील असेह प्रांतात ६.५ रिश्टर चा भूकंप. यात किमान ९७ लोक मृत्युमुखी.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२० : बालाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवा यांचा जन्म. (मृत्यू: २३ जून १७६१)
१७२१ : बाळाजी बाजीराव तथा 'नानासाहेब पेशवा' (मृत्यू: २३ जून १७६१)
१७६५ : एली व्हिटनी - कापसाच्या जिनिंग मशीनचा संशोधक (मृत्यू: ८ जानेवारी १८२५)
१८६१ : जनरल मोटर्स आणि शेवरलेट चे संस्थापक विलियम सी. दुरंत यांचा जन्म. (मृत्यू: १८ मार्च १९४७)
१८७५ : भारताचे स्वातंत्र्य सैनिक तेज बहादुर सप्रू यांचा जन्म.
१८७७ : नारायण सदाशिव मराठे तथा 'केवलानंद सरस्वती' महाराष्ट्रातील धर्मसुधारणावादी श्रेष्ठ संस्कृत पंडित, संस्कृतमीमांसाकोशाचे संपादक (मृत्यू: १ मार्च १९५५)
१८९४ : पॉपय कार्टून चे निर्माते ई. सी. सेगर यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १९३८)
१८९७ : पं. बाळकृष्ण शर्मा ऊर्फ 'नवीन' - हिन्दी कवी. हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. (मृत्यू: २९ एप्रिल १९६०)
१९०० : उदय शंकर - जागतिक कीर्तीचे नर्तक व नृत्यदिग्दर्शक, पद्मविभूषण (१९७१), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९६२) व फेलोशिप विजेते. त्यांनी अल्मोडा येथे 'इंडिया कल्चरल सेंटर'ची स्थापना केली. (मृत्यू: २६ सप्टेंबर १९७७)
१९०१ : भारताच्या संसद चे सदस्य अमरनाथ विद्यालंकार यांचा जन्म.
१९२७ : पंजाब चे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांचा जन्म.
१९३५ : धर्मेन्द्र - चित्रपट अभिनेता
१९४२ : भारतीय क्रिकेटपटू हेमंत कानिटकर यांचा जन्म.
१९४४ : शर्मिला टागोर - चित्रपट अभिनेत्री
१९५१ : नोर्थेन अंड शेल चे संस्थापक रिचर्ड डेसमंड यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४७ : भारताचे स्वातंत्र्य सैनिक भाई परमानन्द यांचे निधन.
१९७८ : गोल्डा मायर - शिक्षिका व इस्त्रायलच्या ४ थ्या पंतप्रधान (जन्म: ३ मे १८९८)
२००४ : प्रसिद्ध कॅमेरामन सुब्रतो मित्रा यांचे निधन.
२०१३ : नोबेल पारितोषिके ऑस्ट्रेलियन-इंग्लिश केमिस्ट आणि शैक्षणिक जॉन कॉर्नफॉथ यांचे निधन. (जन्म: ७ सप्टेंबर १९१७)
२०१५ : जवाहरलाल नेहरू विद्यापीठामध्ये विधार्थ्यांचे आवडते आणि प्रसिद्धी असलेले लेखक रमाशंकर यादव यांचे निधन.

दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रहण सुटेना

एकच वैद्यकीय अधिकारी असल्याने रूग्णांची हेळसांड

वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणी कमी होण्याचे चिन्ह दिसेनात.दासखेडचे भुमिपुत्र आणि मुख्यमंत्र्यांचे तत्कालीन ओएसडी कृष्णा जाधव यांच्या पाठपुराव्यातुन तब्बल २ कोटी ६३ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व सुविधांनी सुसज्ज ईमारत पुढा-यांच्या श्रेयवादात उद्घाटनाच्या प्रतीक्षेत २ वर्षांपासून धुळखात पडुन होती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.सरीता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआर्के/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांना लेखी तक्रार केल्यानंतर त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना उद्घाटनाची प्रतिक्षा न करता प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.त्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासून दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा सुरू झाली.

त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ.पुजा माने आणि डॉ.शरयु पडोळे यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र गेल्या ४ महिन्यांपासून केवळ डॉ.शरयु पडोळे याच आरोग्य सेवा देत असुन डॉ.पुजा माने या ४ महिन्यांपासून अद्याप रूजु झाल्याच नाहीत. सध्या कडाक्याच्या थंडीमुळे सर्दी, घसादुखी, श्वसन विकारांच्या रुग्णांत वाढ झाली असुन लहान मुलांसह वृद्ध नागरीक व महिला व पुरुष यांची भर पडली असुन एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यांवर प्राथमिक आरोग्य केंद्राची मदार असल्याने रूग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असुन तातडीने त्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य आधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात ४ शिपाई,१ आरोग्य सेवक,१ औषधी निर्माता,१ कनिष्ठ लिपिक,१ लॅब टेक्निशियन , मुख्यमंत्री लाडका भाऊ योजनेंतर्गत १ महिला आरोग्य सहाय्यक यांची पदभरती करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ५०-६० रूग्ण तपासणीसाठी येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणाऱ्या एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर याचा शारीरिक व मानसिक ताण पडत आहे. तसेच काही कामानिमित्त रजा घेतली तर मात्र रूग्णांची अडचण निर्माण होऊन त्यांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करत पाटोदा येथील रूग्णालयात जावे लागते.

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती देण्यात आलेल्या डॉ.पुजा माने यांना दि.०७ मार्च पासुन कोणताही रजेचा अर्ज कार्यालयास सादर न करता अनाधिकृत रित्या गैरहजर राहिल्याने सेवा समाप्तीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल व शिस्त भंग विषयक कारवाई करण्यात येईल अशी नोटीस बजावुन उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडळ लातुर यांना कळविण्यात आले असुन लवकरच वरीष्ठांच्या आदेशाने प्राथमिक आरोग्य केंद्रात दुसऱ्या वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल व आरोग्य सेवेत अडचण येणार नाही असे डॉ.उल्हास गंडाळ यांनी डॉ.गणेश ढवळे यांना सांगितले.

अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या जीवाशी चाललेला खेळ थांबवा

बोगस औषध पुरवठा प्रकरणाची एसआयटी चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा - राजेभाऊ फड

परळी । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे जवळपास तीन जिल्ह्यातील गोरगरीब जनतेसाठी जीवनदायी रुग्णालय आहे. दररोज हजारो रुग्णांवर येथे उपचार होतात. याच रुग्णालयात बोगस औषधाचा पुरवठा सुरू असल्याची बाब नुकतीच उघड झाली. याबाबत पोलिसांत गुन्हाही नोंद झालेला आहे. मात्र एवढ्यावर हे प्रकरण न थांबवता त्याच्या मुळाशी जाणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील प्रकरण हे गंभीर असून याची पाळेमुळे राज्यात इतर ठिकाणीही असू शकतात. प्रशासकीय यंत्रणेतील अनेक बड्या लोकांचे यात हात असण्याची दाट शक्यता आहे. म्हणून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बोगस औषधांचा पुरवठा होत असल्याचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. शासनाने नेमून दिलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधाचा पुरवठा केल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले. याबाबत अंबाजोगाई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील बोगस औषध पुरवठा प्रकरणात गुजरात आणि ठाणे जिल्ह्याचे कनेक्शन असून ही टोळी राज्यात आणि आंतरराज्य सक्रिय असण्याची दाट शक्यता आहे. गोरगरीब रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. गोरगरीब रुग्णांना खाजगी दवाखान्यात उपचार घेणे परवडत नाही, त्यांच्यासाठी हे शासकीय रुग्णालये वरदान ठरतात. तिथे असे प्रकार उघडकीस होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासकीय यंत्रणेत अशा स्वरूपाचा भ्रष्टाचार ही नक्कीच हादरविणारी बाब असून, यातील सर्व दोषींची सखोल चौकशी व्हावी आणि त्यांना कठोर शिक्षा करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

उच्चस्तरीय चौकशी करा

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बोगस औषधांचा पुरवठा होणे ही गंभीर आणि निंदनीय बाब आहे. या गैरप्रकारात अनेकांचा हात असण्याची शक्यता आहे. सदरील शासकीय औषध पुरवठा कंत्राटदाराला कुणाच्या शिफारशी नुसार कंत्राट देण्यात आले? कोणत्या मंत्र्याचा? कोणत्या शासकीय अधिकाऱ्याचा यात सहभाग आहे? हा कंत्राटदार कुठून औषध उपलब्ध करत होता? कोणत्या कंपन्यांशी त्याचे हितसंबंध आहेत? जिल्ह्यातील कोणते शासकीय अधिकारी यात सहभागी आहेत? याची निःपक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी एसआयटी पथक नेमून या प्रकरणाचे पाळेमुळे शोधावेत व दोषींना शिक्षा करावी अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे.

एसकेएच महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

बीड । प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव लोकनेते माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय द्वारा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिराचे घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन लोकनेते जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक गिरीष देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाचे सल्लागार तथा काकू- नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, सुनील पांगारकर, सुभाष क्षीरसागर, सतिश राठौर, प्रकाश राठोड, परमेश्वर धारकर, श्रीराम कुर्हे, जयश्री विधाते, उपप्रचार्य डॉ.गणेश पांगारकर, विलास विधाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

काकू नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानवी जीवनात रक्तदानाचे अनन्य साधारण महत्त्व असून माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने प्रचंड यश संपादन केलेले असले, तरीही अद्याप कृत्रिम रक्त तयार करण्यास यश आलेले नाही त्यामुळे मानवी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानानंतर काही तासांतच शरीरास आवश्यक रक्त निर्मिती होऊन योग्य रक्त पातळी तयार होते.शहरातील विविध रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा मोठा तुटवडा असून रुग्णाबरोबरच त्यांच्या नातेवाईकांना देखील गंभीर समस्येला तोंड द्यावे लागते.सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय दरवर्षीप्रमाणे यावर्षीही लोकनेते जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य सातत्याने करत आले आहे. यावेळी एच एम एम विभागाचे प्रा.डॉ.शेख नासेर, डॉ.वैभव शहापुरे, डॉ.अशोक शिंदे, ग्रंथपाल डॉ.गणेश खेमाडे, सहाय्यक ग्रंथपाल सौ.उषा राऊत, राणी रणखांबे यांचे सह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे दादा कुंबकर, गौतम मैरठ, आर.एस.खेडकर, नितीन सोळंके, बालाजी घुले, अक्षय घुले, मयुरेश गायकवाड यांनी रक्त संकलन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा.राजा मचाले, डॉ.विवेक दुसाने, उमेश वाघमारे, ज्योतिबा काळे, दत्ता आघाव यांनी परिश्रम घेतले. यावेळी फार्मसी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. अंजली पवार, डॉ.मीना हंगे, डॉ.सोनल बाहेती, डॉ. मीना भस्मे, डॉ.अंजली क्षीरसागर,डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ.सुरेश तोष्णीवाल, डॉ.शेख जाफर, डॉ.ज्ञानेश्वर जोशी, डॉ.राजेश कुलकर्णी आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केएसके महाविद्यालयात जिल्हास्तरीय युवक महोत्सवात

बीड । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद,बीड व शिक्षण विभाग जि.प.नेहरू युवा केंद्र , राष्ट्रीय सेवा योजना बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झालेल्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवात समूह लोकगीत, काव्यलेखन, कथा लेखन या कला प्रकारात प्रथम क्रमांकाचे पुरस्कार सौ.के.एस.के.महाविद्यालयास प्राप्त झाला.

सांस्कृतिक कार्यक्रमातील समूह गीत कला प्रकारात अविष्कार क्षीरसागर,सतिश गायकवाड, आदित्य दुन्गु, अमर मोरे, कैवल्य सुरवसे,विशाल अंकुशे,राजेंद्र तिपाले, पवन शिंदे,विजय कोरडे यांनी सहभाग घेतला. तसेच काव्यलेखन व कथा लेखन या कला प्रकारात सुरज राधाकिशन उफाडे यांनी सहभाग घेऊन या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला असून या सर्व संघाची निवड परभणी येथे होणार्या विभागीय युवा महोत्सवासाठी झालेली आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही.क्षीरसागर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., डॉ.सुधाकर गुट्टे, कार्यालयीन अधिक्षक डॉ.विश्वांभर देशमाने तसेच संगीत विभाग प्रमुख डॉ.सुरेखा जोशी, डॉ.दीपक जमधाडे यांचे मार्गदर्शन तर साथसंगत प्रा.सुरेश थोरात, प्रा.इंद्रजीत भांगे, प्रा. पवन शिंदे यांनी केली. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

नेकनूर । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ढास डी. के यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांनी म्हटले की, युगपुरुष बाबासाहेब आंबेडकर आजही देशभरात प्रेरणास्त्रोत आहे. सामाजिक न्याय, शिक्षण आणि समता या क्षेत्रात त्यांनी सुरू केलेली क्रांती नेहमीच प्रासंगिक राहील. त्यामुळेच भारतीय इतिहासात ६ डिसेंबर ही महत्त्वाची तारीख म्हणून नोंदवली जाते. या दिवशी देशभरात महापरिनिर्वाण दिन म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली जाते. महापरिनिर्वाण म्हणजे बौद्ध धर्मातील आत्म्याची मुक्ती. आणि आंबेडकरांच्या महान आत्म्याला शांती आणि त्यांच्या अमूल्य सेवेचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुजावर एस. टी. यांनी केले तर आभार डॉ. राजेश आरदवाड यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आष्टी : बेलगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय समितीच्या अध्यक्षपदी सतिष बापूराव पोकळे यांची निवड झाल्याबद्दल आष्टी तालुका पत्रकार संघ्याच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, अध्यक्ष प्रविण पोकळे,एन.टी.भाऊ गर्जे,पत्रकार रघुनाथ कर्डीले,गणेश दळवी,सचिन रानडे,शरद रेडेकर,बाळासाहेब पोकळे,कृष्णा पोकळे,मनोज पोकळे आदींनी नवनिर्वाचित अध्यक्ष यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

केज तालुका प्रमुखपदी पृथ्वीराज पाटील

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे, शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांच्या आदेशाने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेना केज तालुका प्रमुख पदी पृथ्वीराज पाटील यांचे निवड झाली. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केजमध्ये तरुणाला संधी दिली असून केज तालुक्यात पाटील यांचा दांडगा जनसंपर्क आहे. यामुळे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत पाटील यांचा शिवसेनेला नक्कीच फायदा होईल असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला.

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर केज तालुका शिवसेनेची महत्वपूर्ण बैठक शनिवारी (दि.७) पार पडली. या बैठकीत पृथ्वीराज पाटील यांची शिवसेना केज तालुका प्रमुखपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, केज तालुक्यातील विविध सामाजिक कार्यक्रमात पृथ्वीराज पाटील यांचा सक्रीय सहभाग आहे. यामुळे पाटील कुटुंबीय संपुर्ण बीड जिल्ह्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रात परिचित आहे. केज तालुक्यात व केज मतदारसंघात पाटील कुटुंबाचा दांडगा जनसंपर्क असून आगामी पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पृथ्वीराज सुरेशराव पाटील यांची नियुक्ती शिवसेनेसाठी फायदेशीर ठरणार आहे असे सचिन मुळूक म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनीही पृथ्वीराज पाटील यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित शिवसेनेचे जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे , युवा सेना तालुकाप्रमुख सुग्रीव सक्राते, शहर प्रमुख बालासाहेब पवार , तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे , उपतालुकाप्रमुख चंद्रकांत इगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, ज्येष्ठ शिवसैनिक डॉ. संतोष बुडुक, युवा सेना शहरप्रमुख आकाश चाळक तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ई-पीक नोंदणीसाठी प्रत्येक गावात मदतीसाठी एक सहायक नेमणार

१०० % नोंदणी होईल,तहसिलदार पाटील यांची माहिती

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील रब्बी हंगाम १ डिसेंबरपासून सुरू झाला आहे.पीक पाहणीसाठी यापूर्वी ई-पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध होते. आता या ॲपमध्ये काही तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत.यामुळे आता नवीन स्पात ई-पीक पाहणी डीसीएस नवीन रुपात उपलब्ध करून दिले आहे.यामुळे आता यापुढे संपूर्ण तालुक्यात १०० टक्के ई-पीक पाहणी होईल, अशी माहिती तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली आहे.

आष्टी येथील पंचायत समिती कार्यालयातील सभागृहात गुरूवार दि.६ रोजी दुपारी कर्मचा-यांची आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत आष्टी तहसिलदार वैशाली पाटील बोलत होत्या.यावेळी मास्टर ट्रेनर गजेंद्र राठोड,मंडळ अधिकारी नवनाथ औंधकर, अव्वल कारकून जयदत्त चव्हाण व तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवक उपस्थित होते.पुढे बोलतांना पाटील म्हणाल्या,शेतकरी स्वतः पिकांची नोंदणी ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे नोंदवत आहेत.ज्यांनी नोंदवलेली नाही,ती तलाठ्यांमार्फत करण्यात येत आहे. त्यामध्ये दुरुस्ती करून शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणीसाठी सहायकांची नेमणूक करण्यात येत आहे.प्रत्येक गावासाठी एक सहायक उपलब्ध राहील.त्याच्याद्वारे ई-पीक पाहणी नोंदणी अभियान राबवण्यात येणार आहे.पीक विमा,पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांच्या लाभासाठी पीक पाहणे डीसीएस मोबाईल ॲपमध्ये नोंद असणे,यापुढे आवश्यक राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ढगाळ वातावरणामुळे गहू पिकाला धोका निर्माण झाला आहे.पिकातील ५० मीटरच्या आतील दोन फोटो आवश्यक पीक पाहणी करण्यासाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आतील पिकांचे दोन फोटो घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी तसेच समस्या सोडवण्यासाठी सहायक उपलब्ध राहतील,असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सफाई कामगारांच्या थकीत वेतनासाठी जि.प. समोर आमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांना गेल्या १३ महिन्यांचे मासिक वेतन न मिळाल्यामुळे ते दि. ९ डिसेंबर २०२४ पासून बीड जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण करणार असल्याचे पत्रक प्रसिद्धिस दिले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, केज, अंबेजोगाई, परळी, माजलगांव आणि धारूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या सफाई कामगारांना फ्रन्टीयर एक्स सर्व्हिसमन असोसिएशन लातूर या एजन्सी मार्फत काम मिळाले आहे. जिल्हा परिषदेकडून टेंडर घेताना संबंधित एजन्सीने नियमित मासिक वेतन देणे, फंडाची रक्कम कपात करणे आणि शासनाने मान्य केलेले किमान वेतन देण्याविषयी स्टॅम्प पेपरवर नोटरी करून करारनामा करून दिला आहे. मात्र, त्याप्रमाणे कसलीही अंमलबजावणी झालेली नाही. विशेष म्हणजे मूळ नियोक्ता (प्रिन्सिपल एम्प्लॉयर) म्हणून जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी करारपत्राप्रमाणे हस्तक्षेप करत नसल्यामुळे कामगारांची अवस्था वेठबिगारासारखी झाली आहे. या मुख्य नव-नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कैफियत ऐकून सुध्दा घेत नाहीत. त्यामुळे सफाई कामगार आर्थिक अरिष्टात सापडले आहेत. त्यांच्या कुटुंबियावर उपासमारीची पाळी आली आहे. त्यामुळे दि. ९ डिसेंबर २०२४ पासून सफाई कामगार जि. प. बीड समोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे पत्रक कॉ. नामदेव चव्हाण, भागवत नन्नवरे, ओम खरबड, शोभा उजगरे, राणी वाघमारे, पांडुरंग शिंदे, योगेश मेटे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

आचारसंहितेमुळे काढलेले चौकातील ध्वज पुन्हा फडकविले

वडवणी । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकासह सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज नगरपंचायत प्रशासन व पोलिस बंदोबस्तात उतरविण्यात आलेले होते.तरी सामाजिक तरूणांनी एकत्र येऊन काल शनिवार रोजी सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज लावण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीत प्रशासनाने निवडणुकीची आदर्श आचारसंहितीचे पालन करण्यासाठी राजकीय पक्षांचे फलक यासह इतर नियम पाळण्यासाठी तालुका प्रशासनाने मोहीम सुरू केलेली यामध्ये आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने मोहीम सुरू केलेली आहे यामध्ये वडवणी शहरातील आचारसंहितेच्या कारणावरून नगरपंचायचे मुख्याधिकारी, कर्मचारी यांनी पोलिस बंदोबस्तात शहरातील छत्रपती

शिवाजी महाराज चौक, आण्णाभाऊ साठे, वसंतराव नाईक चौक , संभाजी महाराज चौक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, अहिल्यादेवी होळकर, संत सेवालाल महाराज चौक, संत सेना महाराज चौक यासह महापुरुषांच्या चौकातील ध्वज काढून टाकण्यात आले होते. याअगोदर प्रशासनाने झालेल्या निवडणुकीत महापुरुषांच्या चौकातील ध्वज काढून टाकण्यात आले नव्हते तरी घटनेचा सोशल मीडियातुन समाज बांधवांनी तिव्र संताप व्यक्त करून प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त केला होता.तरी या सर्व महापुरुषांच्या चौकातील ध्वज काल शनिवार रोजी सामाजिक तरूणांनी एकत्र येऊन सन्मानाने लावण्यात आले आहेत. हे सामाजिक कार्य सतिश मस्के, अतुल मस्के, पत्रकार अविनाश मुजमुले, अमोल मस्के या चौघांनी मिळुन केले आहे. तरूणांनी राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. यावेळी डिसीसी बँकेचे संचालक अमोल आंधळे, युवराज शिंदे, मुन्ना मुंडे, शिवाजी तौर,ॲड. भास्कर उजगरे, अकबर भाई, सुरेश भोरे, सुग्रीव मुंडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. तुकाराम आडे, पत्रकार विनायक जाधव, पत्रकार रामेश्वर गोंडे, प्रेमदास राठोड, शहाजी लोकरे, संभाजी दराडे, कृष्णा शिंदे, महादेव सावंत, बाळु आडे, प्रशांत डिगे, चक्रधर हेंद्रे, सुरज शिंदे, अनिल शिंदे, सह आदी उपस्थित होते.

पंकजाताईंचे हात बळकट करण्यासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नोंदणी करणार -नवनाथ शिराळे

गेवराई । प्रतिनिधी

लोकनेत्या भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांचे हात पक्षात बळकट करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व मतदार संघात मोठ्या प्रमाणात भाजप सदस्य नोंदणी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हा संयोजक नवनाथ आण्णा शिराळे यांनी बोलताना केले

गेवराई तालुका भाजपच्या सदस्य नोंदणी अभियान बैठकीत बोलताना शिराळे म्हणाले की, जगात सर्वाधिक सदस्य असलेले राजकीय संघटना ही भारतीय जनता पक्ष आहे या सघटनेची गल्ली ते दिल्ली सत्ता असुन कार्यकर्त्यांनी जनसेवेचा वसा घेऊन लोकांची कामे करावीत लोकनेत्या पंकजाताई मंत्री होणार आहेत त्यामुळे त्यांचे हात पक्षात बळकट करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने पक्ष सदस्य नोंदणी मधे सहभागी होऊन जास्तीत जास्त लोकांना सदस्य करुन घ्यावे असे आवाहन केले. जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचे नेतृत्वात लवकरच प्रत्येक तालुक्यात पक्षाचे कार्यालय सुरु होणार असुन त्यामघे जनतेचे प्रश्न मार्गी लागतील असे यावेळी समन्वयक श्रीकांत सानप यांनी सांगितले.

या बैठकीस तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे,मा जिप सदस्य सुरेश हत्ते,जिल्हा सहसंयोजक उद्धव रासकर,मा पंस सभापती दीपक सुरवसे,तालुका संयोजक ईश्वर पवार, ज्ञानेश्वर खाडे,महादेव धोंडरे,संजय काळे,पं स सदस्य अशोक शिंदे,बाळासाहेब सानप,राजेश पवार, राहुल राका, श्रीराम गव्हाणे, मच्छिंद्र यादव, सुशील भोपळे,रामचंद्र कोळेकर,रंजीत शर्मा,बाळासाहेब लोंढे, प्रवीण करांडे,डॉ शेख इब्राहिम,मगन चव्हाण अनिल रत्नपारखे, सचिन दाभाडे,रवी खरसाडे,भीमाशंकर मिटकरी,संतोष थोरात,बाळू जोशी,विवेक कुलकर्णी,सुधीर शर्मा,गणेश देवा, अंकुश राठोड, शहादेव दादाराव सर, बाबासाहेब,घोडके प्रदीप उगलमुगले,नारायण गाडे,संजय भाऊ काळे, दिलीप चव्हाण, संदीप आंधळे, भागवत गव्हाणे, पुरुषोत्तम जगताप,पप्पू खेडकर, मुकुंद जगताप,ऋषिकेश पांचाळ, शेख दिलावर,सुनील नाटकर,शेख सलीम, कृष्णा बारगजे, शरद राधाकिसन मोटे, बाळासाहेब लोणकर,पांडुरंग जाधव, चंद्रसेन उबाळे,अंकुश कदम, गणेश सातपुते,दयानंद गवारे,विकास गायकवाड,नवनाथ साबळे, बाबुराव शिंदे,तुकाराम राजकवर, गोविंदा अबदर, फुलचंद पवार ,एकनाथ माने, सुंदर महाराज राठोड, बाळासाहेब पांढरे, सतीश पांढरे,आत्माराम पांढरे, महादेव खरात, विष्णु महाराज जगताप, कारभारी कोकरे,व इतर असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त गजानन विद्यालयात विविध स्पर्धा

नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा संपन्न झाल्या.

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी येथे दि.२ डिसेंबर ते दि.७ डिसेंबर या कालावधीत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा ,कथाकथन स्पर्धा शाळेचे मुख्याध्यापक केशव भांगे,

◀◀ पान ३ वर

अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील बनावट औषध प्रकरणाचा तपास सीबीआय मार्फत व्हावा - डॉ.इंगोले

अंबेजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रुग्णांना देण्यात आलेली औषधी बनावट असल्याचे तपासणी अहवालात सिद्ध झाले आहे. याप्रकरणी अन्न औषध निरीक्षक यांच्या फिर्यादीवरून चार औषध कंपन्यांवर गुन्हेही दाखल झाले आहेत. याप्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी अंबेजोगाईचे माजी शिक्षण सभापती डॉ. राजेश इंगोले यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय आधिकारी कार्यालयामार्फत केली आहे.

या घटने बाबत बोलताना डॉ इंगोले यांनी हे प्रकरण वरकरणी वाटते तेवढे सोपे नाही. या कंपन्यांनी महाराष्ट्रातील इतर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या ठिकाणीही याच प्रकारची बनावट औषधी वितरित केली असल्याची शक्यता आहे. याप्रकरणी वैद्यकीय संचालक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचाही सहभाग असल्याची शक्यता नाकारता येत नाही कारण ही औषधी वितरित करण्याची शासकीय मान्यता ही याच संचालक कार्यालयाकडूनच दिली जाते.

या लोकांची बनावट औषधी देण्याची हिम्मत होतेच कशी हा सवाल करत सदरील गंभीर प्रकार हा महाराष्ट्रातील सर्व शासकीय रुग्णालयात घडल्या असण्याची शक्यता आहे. हा प्रकार म्हणजे सर्वसामान्य रुग्णांच्या जीविताशी खेळ करण्याचा गंभीर प्रकार आहे.

तरी या प्रकरणाची पाळेमुळे उकरून याचा निष्पक्षपाती तपास होणे गरजेचे आहे. तसेच या आरोपींविरुद्ध या कंपन्यांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही होणे गरजेचे आहे. जेणेकरून भविष्यामध्ये इतर कंपन्या असा प्रकार करण्याचे धाडस करणार नाही यासाठी हे प्रकरण सीबीआय कडे देऊन सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा ही अपेक्षा सर्वसामान्य जनतेची आहे. या प्रकरणात कुणालाही पाठीशी घालण्यात येवु नये त्यासाठी या घटनेचा पाठपुरावा आपण शेवटपर्यंत करणार असल्याची माहितीही डॉ राजेश इंगोले यांनी दिली आहे.

आ.सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्रीपदी व बीड जिल्हा पालकमंत्री करा –भोसले

पाटोदा । प्रतिनिधी

आ.सुरेश आण्णा धस यांच्या दमदार आमदार लोकप्रिय नेते निधड्या छातीचा मराठवाड्याला व बीड जिल्ह्याला पालकमंत्री असावा अशी मागणी जोर धरून येत आहे कोरोना मध्ये केलेले काम अनेक प्राण वाचवले धडपड केली.

कारखान्यावरील शेतकरी कष्टकरी सामान्य जनतेशीं नाळ असा नेता बीड जिल्ह्याचा पालकमंत्री करण्यासाठी भारतीय जनता पार्टी लोकनेते सुरेश आण्णा धस यांना बीड जिल्ह्याचे पालकमंत्री करावे अशी मागणी.युवा नेते जितेंद्र भोसले पाटोदा

बारा बलुतेदारांना सोबत घेऊन चालणाऱ्या आ.सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्री करा-कदम

आष्टी । प्रतिनिधी

राजकारणात कधीच जाती-पातीमचे राजकारण न करता बारा बलुतेदारांना सोबत घेऊन,मायक्रो ओबीसींचे प्रश्न क्षणाचाही विचार व विलंब न करता सोडविणारे आष्टी,पाटोदा,शिरुर विधानसभा मतदार संघाचे माजी मंत्री सुरेश धस यांना कॅबीनेट मंत्री करावे अशी मागणी नाभिक संघटनेचे आष्टी शहराध्यक्ष प्रविण कदम यांनी केली आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सुरेश धस यांनी ७८ हजाराच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला आहे.आ.सुरेश धस यांनी यापूर्वी तीन वेळा विधानसभेचे नेतृत्व केलेले आहे.एक वेळा बीड- लातुर-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेचे आमदार म्हणुन काम केलेले आहे.त्यांच्या जवळ आमदारकीच्या चार टर्मचा दांडगा अनुभव आहे.त्यांचा जनसंपर्कसुद्धा खूप मोठा आहे.लोकशाही आघाडी सरकारच्या काळात त्यांनी महसूल व पुनर्वसन सह अनेक

खात्याचे राज्य मंत्रीपदसुद्धा भूषविले आहे.आ.सुरेश धस यांनी मंत्रिपदाच्या काळात अतिशय उत्तम असे काम केलेले आहे.याच दरम्यान उत्तराखंडमध्ये आलेली पर परिस्थिती असो की,आष्टी मतदार संघात पडलेला दुष्काळ असो आ. सुरेश धस यांनी आपल्या कौशल्याचा वापर करून ही परिस्थिती उत्तमपणे हाताळलेल्या होती.आ.धस यांच्याजवळ आमदारकीच्या चार टर्मचा दांडगा अनुभव आहे.त्यांचा जनसंपर्क सुद्धा खूप मोठा आहे.आघाडी

◀◀ पान ३ वर

दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील दत्त जयंती उत्सव समितीकडून दत्त जयंती मोठ्या उत्साहा मध्ये दरवर्षी साजरी केली जाते. याही वर्षी मोठ्या उत्साहामध्ये दत्त जन्मोत्सव साजरा होणार आहे यामध्ये अखंड हरिनाम सप्ताह आठ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यंत चालणार असून यामध्ये श्री. गुरुचरीत्रपारायण सोहळा व रामायण कांड कथासार होणार असून या आठ दिवसांमध्ये विविध अमृततुल्य असे किर्तन होणार असून यामध्ये ८ डिसेंबर रोजी याची सुरुवात होऊन पहिल्या दिवशीचे कीर्तनकार श्री.ह.भ.प.उद्धव महाराज चोले, खडकीदेवळा, ९ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री, शुक्लेश्वर निमगाव, १० डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. विष्णु महाराज जगताप (अध्यक्ष गितामंदिर संस्थान, पैठण) ,११ डिसेंबर रोजी श्री.ह.भ.प. शिवाजी महाराज मुळे आडस, १२ डिसेंबर रोजी श्री. ह.भ.प. पांडुरंग महाराज मुंडे जहागीरमोहा,

◀◀ पान ३ वर

बेलगावच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सतिष पोकळे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय समितीच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्यपद निवडीसाठी आयोजित बैठकीत बेलगाव शाळा व्यवस्थापन समितीच्या ईश्वरी चिठ्ठी मध्ये अध्यक्षपदी आ.सुरेश धस यांचे समर्थक सतिष बापुराव पोकळे यांची निवड झाली आहे.

तर उपाध्यक्ष म्हणून श्रद्धा सचिन पोकळे, सदस्यपदी अण्णासाहेब आत्माराम पोकळे,प्रियंका अनिल सकुंडे,रंजना नागेश शिंदे, महादेव मधुकर पोकळे,अशोक रोहीदास पोकळे,भाउसाहेब पोपट खंडागळे,नामदेव ज्ञानदेव घोडके, शिक्षण प्रेमी नागरिक सुधीर मारुती पोकळे,स्व. संस्था प्रतिनिधी बाळासाहेब लक्ष्मण पोकळे, शिक्षक प्रतिनिधी गणेश म्हस्के सचिव मुख्याध्यापक रघुनाथ

आष्टी तालुका पत्रकारच्या वतीने सत्कार

◀◀ पान ३ वर

मुलींनी घेतली एचआयव्ही तपासणी केल्याशिवाय विवाह न करण्याची शपथ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोजी जागतिक एड्स दिन आणि पंधरवडा निमित्ताने आज अंबाजोगाई येथील वेणूताई चव्हाण महिला कला वाणिज्य महाविद्यालय अंबाजोगाई या ठिकाणी रेड रिबीन क्लबच्या अंतर्गत व स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयव रूग्णालय चा आयसीटीसी यांच्या संयुक्त विद्यमानाने एचआयव्ही जनजागृती आणि एचआयव्ही तपासणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे समुपदेशक श्री धनराज पवार हे उपस्थित होते तसेच

महाविद्यालयाचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ विश्वास लवंद सर हे पण या कार्यक्रमाला उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य माननीय श्रीमती अखिल गौस मॅडम ह्या होत्या तर एनएसएस प्रमुख श्री चव्हाण सर काशीद सर, संध्या ठाकरे मॅडम व इतर सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या उपस्थित होते सुरुवातीला महाविद्यालयाच्या वतीने मा श्री धनराज पवार यांचे तसेच विश्वास लवद यांचा स्वागत करण्यात आले त्यानंतर महाविद्यालयाच्या वतीने रेड रिबीन क्लब चा माध्यमातून जे काही कार्यक्रम चालतात याबद्दल विभागाचे प्रमुख श्री चव्हाण सर यांनी सखोल अशी माहिती दिली या यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री धनराज पवार समुपदेशक यांनी व उपस्थित मुलींना असा सल्ला दिला की आपल्या जीवनामध्ये आपण जगत असताना आपल्याला जे काही पाहिजे ते आपण मिळवण्यासाठी कोणत्याही प्रयत्नाला मागे पडत नाहीत परंतु आपल्याला ज्या वेळेस विवाह करायचा असतो त्यावेळेस समोरील मुलांचे किंवा मुलीचे फक्त प्रॉपर्टी आणि इतर गोष्टीचा आपण

◀◀ पान ३ वर

देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत विवाह सोहळा संपन्न

भागवत साबळे । दिंद्रुड

धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे मल्हारी म्हाळसाकांत खंडेरायाची मोठी यात्रा भरते. याच पार्श्वभूमीवर शनिवारी पहाटे सुर्योदयापूर्वी खंडेरायाच्या लग्नाचा पारंपारिक सोहळा पार पडला. देवाच्या विवाह सोहळ्यास हजारो भाविक भक्तांनी उपस्थिती लावली. यात्रेत सोमवारी कुस्त्यांची जंगी दंगल रंगणार असून पहिलवान व कुस्ती शौकीन मंडळींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन यात्रा उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

चंपाषष्ठी निमित्त सबंध महाराष्ट्रात ठिकठिकाणी खंडोबाची यात्रा भरते. देव दहिफळ येथे तब्बल दोन महिने ही यात्रा चालते. नागदिवे पूजन दिवशी दिंद्रुड येथील मानाची खंडोबा काटी तसेच मोगरा, नाकलगाव आणि बाबळगाव येथील पालखी दहिफळ येथे दाखल झाल्या. रात्री शोभेची दारू उडवण्यात आली. दि.७ शनिवारी चंपाषष्ठीच्या पहाटे सुर्यदयापूर्वी खंडोबा देवाचे म्हाळसा देवी सोबत लग्न लावण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. हजारो भाविक भक्तांनी देवाच्या लग्नास उपस्थित राहून दर्शन घेतले.

यात्रेनिमित्त सोमवारी कुस्त्यांची जंगी दंगलीचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती श्री खंडोबा देवस्थान कमिटी कडून देण्यात आली. कुस्तीच्या दंगलीतील कुस्ती स्पर्धे मध्ये १० रुपया पासुन ते ५१०१ रुपयांची

यात्रेत सोमवारी रंगणार कुस्त्यांची दंगल..!

बक्षीस दिली जाणार आहेत. बीड जिल्हा व मराठवाड्यातील कुस्ती प्रेमींना कुस्तीच्या दंगलीस उपस्थित राहण्याचे आवाहन देवदहिफळचे सरपंच श्रीधर बडे यांनी केले आहे. सरपंच श्रीधर बडे,माजी जि.प.सदस्य विलासराव बडे, श्रीहरी बडे, शिवाजीराव बडे, दिलीप बडे, राज बडे, सुग्रीव बडे, रमेश बडे, दामोधर बडे, मुरलीधर बडे, नवनाथ बडे, विष्णुपंत बडे, राजेभाऊ बडे, गोपाळराव बडे, बबन कांदे, अंगद वड्डे, शेख तायेर, सुभाष कांबळे, राज आंधळे, बाळू तोडे, अंगद बडे, खंडू सहजराव, दामूआन्ना बडे, रामराव बडे, बाळासाहेब बडे, राधाकिसन बडे, उत्तम कांदे,पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्या सह गावकऱ्याच्या वतीने करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

बारामती शासकीय रुग्णालयाबाबत तक्रारी वाढल्या; आरोग्य सेवेपासून रुग्ण वंचित

पुणे । प्रतिनिधी

कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चून राज्य सरकारने बारामतीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाची निर्मिती केली. परंतु, शासकीय यंत्रणा तसेच विभागप्रमुखांच्या उदासीनतेमुळे रुग्णांना रुग्णालयात सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. येथील काही विभाग धूळ खात पडून आहेत. परिसरात मोकाट कुत्र्यांच्या मुक्त वावर आहे. सुस्त प्रशासनाचा फटका बारामतीकरांना बसत आहे.

विभागप्रमुखांचा मनमानी कारभार सुरू आहे. यात बदल होणार तरी कधी? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. सुसज्ज रुग्णालय उभारून ५ वर्षांचा कालावधी झाला, तरी रुग्णालय पूर्णक्षमतेने सुरू झालेले नाही. न्याय व वैदिक विभागावर देखील रोष व्यक्त होत आहे. रुग्णालयात दि. ७ व ८ डिसेंबर रोजी न्याय व वैदक विभागामार्फत परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषद आयोजित केलेल्या विभागामार्फत किमान शवविच्छेदन विभाग या इमारतीत होणे अपेक्षित होते. परंतु, तसे झालेले नाही. अधिकार्यांच्या उदासीनतेमुळे हा विभाग धूळ खात पडून आहे. अत्यंत सुसज्ज इमारती, आवश्यक त्या भौतिक सोयीसुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परंतु, अकार्यक्षमतेमुळे रुग्णालयाचा उपयोग सर्वसामान्यांना होत नाही. या ठिकाणी शवविच्छेदनाची व्यवस्था नसल्याने रुई अथवा सिल्व्हर ज्युबिली रुग्णालयात मृतदेह न्यावा लागतो. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या इमारतीमध्ये शवविच्छेदन केले जाते. याशिवाय येथीलच डॉक्टरांनी लिहून दिलेली अनेक औषधे येथे मिळत नाहीत. ती बाहेरून मेडिकलमधून घ्यावी लागतात, अशा स्वरूपाच्या तक्रारी आहेत.

अधिकार्यांची उदासीनता

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री त्यांच्यामुळेच रुग्णालयाला मिळाली. मात्र, त्याचा वापर करण्याबाबत उदासीनता दिसून येते. डॉक्टर आठवड्यातील ठरावीक दिवशीच उपस्थित असतात. कारभार सुधारण्यासह रुग्णांना चांगल्या सुविधा द्या, अशा सूचना अजित पवार यांनी अनेकदा दिल्या आहेत. परंतु, त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

रांजणगाव सांडस येथे बिबट्या जेरबंद

रांजणगाव । प्रतिनिधी

रांजणगाव सांडस (ता. शिरूर) येथे रणपिसे वस्ती येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला आहे. शिरूर तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बिबट्याचा वावर वाढला आहे. मांडवगण फराटा परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून बिबट्याने दोन लहान मुलांवर हल्ले केल्याने त्यांचा मृत्यू झाला होता.



या घटनेनंतर वनविभागाने सर्व लक्ष ऊस पट्ट्यात केंद्रित करत या भागात बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या होत्या. त्या अनुषंगाने मांडवगण फराटा परिसरात सुमारे २० हून अधिक पिंजरे लावण्यात आले होते, तसेच न्हावरे व मांडवगण फराटा या ठिकाणी बेस कॅम्प उभारण्यात आले आहेत. दरम्यान रांजणगाव सांडस येथे गेल्या पाच दिवसांपूर्वी नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाले होते. त्यानंतर तातडीने या ठिकाणी वनविभागाने पाहणी करत पिंजरा लावला होता. दरम्यान या लावलेल्या पिंजऱ्यात पहाटे बिबट्या भक्ष्य खाण्यासाठी आला असताना अलगद अडकला. यानंतर तातडीने वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पिंजऱ्यासह बिबट्या ताब्यात घेतला. दरम्यान गेल्या दोन महिन्यांपासून वनविभाग या परिसरात सातत्याने बिबट्या जेरबंद करण्यासाठी अहोरात्र परिश्रम करीत आहे.शुक्रवारी पहाटे एक बिबट्या जेरबंद झाला तर गेल्या आठवड्यात एक बिबट्या जेरबंद करण्यात यश आले होते. आतापर्यंत वनविभागाने एकूण तीन बिबटे जेरबंद केले आहेत. यापूर्वीचे दोन बिबटे हे माणिकडोह बिबट निवारण केंद्र या ठिकाणी पाठवण्यात आले होते. शिरूर तालुक्यात अनेक ठिकाणी उसाच्या तोडणी सुरू आहेत तसेच या परिसरात मोठ्या प्रमाणावर बिबटे असल्याने लहान मुले तसेच नागरिकांवर हल्ले होण्याची दाट शक्यता असल्याने वनविभाग कटाक्षाने याकडे लक्ष देत आहे. वनविभागाने केलेल्या या धडाकेबाज कामगिरीमुळे नागरिकांची भीती काहीशी कमी झालेली आहे.ही मोहीम काही दिवस सुरू ठेवावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. बिबट्या पकडण्याकामी जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहाय्यक उपवनसंरक्षक स्मिता राजहंस,शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी एस एस कंक,यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल गौरी हिंगणे, वनरक्षक विशाल चव्हाण, शेखर जानगवळी, सुधीर शितोळे, शरीफ शेख, संदीप गव्हाणे, राहुल अवचिते रोहिदास शेंडगे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

शहर स्वच्छ्तेसाठी महापालिका सरसावली

पुणे । प्रतिनिधी

शहरात गेल्या काही महिन्यांत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचत आहेत. महापालिकेकडून साफसफाई केल्यानंतरही वारंवार हे प्रकार घडत शहरात रस्ते, मोकळ्या जागा, दुभाजक, पादचारी मार्ग यांसह अन्य ठिकाणी कचरा पडलेला असतो. अस्वच्छता असते; पण तेथे व्यवस्थित स्वच्छता न झाल्याने शहरभर कचऱ्याचे ढीग साचत आहेत. त्यामुळे शहर स्वच्छतेसाठी महापालिका प्रशासन संयुक्तरीत्या रस्त्यावर उतरणार असून, एकाच वेळी सुमारे दीड हजार कर्मचारी एका क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत उतरवून साफसफाई केली जाणार आहे.

परिमंडळ एकमध्ये ९ ते १४ डिसेंबर या कालावधी ही मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली. याबाबत नुकतीच त्यांनी १५ क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त, आरोग्य निरीक्षक, अतिक्रमण निरीक्षक, आकाशचिन्ह विभाग, घनकचरा विभाग, विद्युत, उद्यान, पथ, मलनिःसारण यासह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ही स्वच्छता केवळ घनकचरा व्यवस्थापन विभागच नाही, तर या बैठकीस उपस्थित असलेले सर्व विभागांचे कर्मचारी करणार आहेत. अशाच प्रकारे शहरातील इतर भागांतही ही स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे.

एकाच वेळी सर्व विभागांची कारवाई

शहरातील दैनंदिन साफसफाईची जबाबदारी पुणे महापालिकेची आहे. मात्र, त्याच वेळी झोपडपट्टी, लगतचे रस्ते स्वच्छ करणे, रस्त्यावरील माती उचल भित्तिपत्रक, दुभाजकातील वाढलेले गवत, शहरात लावलेल्या जाहिराती, रस्त्यावर बंद पडलेली व बेवारस वाहने, डासांची ठिकाणे, वाढलेली झाडे, पावसाळी गटारे, सांडपाणी, याबाबत संबंधित विभागांनी काम करणे आवश्यक आहे. मात्र, हे विभाग ही जबाबदारी एकमेकांवर टोलवत असतात. त्यामुळे या सर्व विभागांना एकाच वेळी एकाच प्रभागात घेऊन स्वच्छता मोहीम राबविली जाणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी स्पष्ट केले.

समाजातील अस्वस्थतेची दखल घेत निवडणूक आयोगानेही बदल स्वीकारला पाहिजे-सुप्रिया सुळे

पुणे । प्रतिनिधी

अमेरिकेसह अनेक देशांमध्ये ईव्हीएमवर बंदी आहे. मी चार वेळा ईव्हीएमवर निवडून आले आहे, माझ्यासह समाजातही ईव्हीएमबाबत अस्वस्थता आहे. म्हणूनच ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या, अशी मागणी होत आहे. त्याची दखल घेऊन निवडणूक आयोगानेही बदल केला पाहिजे, ' अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष व खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी केली. सर्वांशी चर्चा करूनच ईव्हीएम विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याबाबत पुढील आठवड्यात ठरविले जाणार असल्याचेही सुळे यांनी सांगितले.

मार्केट यार्ड येथील निसर्ग कार्यालयामध्ये सुळे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जगताप, पक्षाचे प्रदेश प्रवक्ते विकास लवांडे उपस्थित होते. ईव्हीएम विरोधात सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार का ? या प्रश्नाबाबत सुळे म्हणाल्या, इंडिया आघाडीतील घटक पक्षांची मागील आठवड्यातच चर्चा झाली. काँग्रेस पक्ष अनेक वर्ष ईव्हीएमबाबत काम करत आहे, आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार आहोत. विधानसभा निवडणुकीनंतर आमच्या कार्यकर्त्यांच्या,

जनतेच्या मनातही अस्वस्थता निर्माण झाली आहे. उत्तम जानकर यांचे आंदोलन व मारकडवाडीतील लोकांमधील ईव्हीएमबाबत अस्वस्थता आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही लोकांच्या मनातील ऐकून घेतले पाहिजे.' सुळे म्हणाल्या, 'काँग्रेस पक्षाचे संग्राम थोपटे यांना अनेक केंद्रांवर अत्यल्प मतदान झाले आहे. अशी अनेक उदाहरणे आम्ही देऊ शकतो. हे असे होऊच शकत नाही, असे सर्वांचे म्हणणे आहे. म्हणून उत्तम जानकर यांचा प्रयोग आहे. आम्ही कोणाच्याही वैयक्तीक विरोधात लढत नाही. तर निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि समाजात एखाद्या प्रक्रियेबद्दल शंका असेल, तर ती दुरुस्त व्हायला पाहिजे इतकीच आमची मागणी आहे. विधानसभा निवडणुकीतील ईव्हीएमबाबतचे अनेक पुरावे आम्ही आयोगाला दिले आहेत. बॅलेटवर निवडणूक झाल्यास कोणतीच अडचण येणार नाही.' सत्तास्थापनेला झालेला विलंब व शपथविधीवर बहिष्कार टाकण्याच्या मुद्यावर बोलताना सुळे म्हणाल्या, 'भाजप सरकार यापूर्वी आले तेव्हा, त्यांच्यात सरकार स्थापनेविषयी आक्रमकता होती. यावेळी मात्र निकाल लागल्यानंतरही भाजपने दोन आठवडे सत्तास्थापना व मुख्यमंत्री ठरवण्यासाठी घेतले. आता मंत्रीमंडळाच्या विस्तारालाही उशीर होत आहे. त्यांना इतके मोठे संख्याबळ मिळाले असेल, तर मग लोकांच्या अपेक्षाही असतील. शपथविधीवर बहिष्कार टाकणे हा निर्णयाचा भाग आहे, तो धोरणाचा भाग नाही. इंडिया आघाडीमध्ये आम्ही सर्वजण एकत्र आहोत.'

शासकीय,सार्वजनिक इमारतींमध्ये हिरकणी कक्ष उभारणे बंधनकारक

पुणे । प्रतिनिधी

सार्वजनिक, निमसार्वजनिक, संस्थात्मक, शैक्षणिक व इतर वापराच्या इमारतीमध्ये ज्या ठिकाणी महिला मोठ्या प्रमाणात काम करतात, अशा इमारतींमध्ये स्तनपान करणाऱ्या स्त्रिया, गरोदर महिला व नवजात बालकांच्या माता व सहा वर्षांखालील मुले व मातांसाठी हिरकणी कक्ष उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये नव्याने तरतूद करण्यात आली आहे.

सार्वजनिक, निमसार्वजनिक अशा इमारतींमध्ये महिला कक्ष नसल्यामुळे महिलांना अडचणी निर्माण होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने महिला व बाल विकास विभागानेही हिरकणी कक्ष स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. यासर्व पार्श्वभूमीवर नगर विकास विभागाने सार्वजनिक, संस्थात्मक अशा इमारतीमध्ये महिला कक्षची सेवा पुरविणे बंधनकारक करण्यासाठी युडीपीसीआर नियमावलीमध्ये नव्याने तरतूद समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे मत नोंदविले आहे. त्यानुसार सार्वजनिक, संस्थात्मक इमारतींमध्ये हिरकणी कक्ष उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे.

इमारतीच्या तळमजला अथवा पहिल्या मजल्यावर हिरकणी कक्ष स्थापन करण्यात यावा, स्वच्छतागृहाची सुविधा असावी, आवश्यक तो उजेड, हवा खेळती राहावी, असे निकष ठरविण्यात आले आहे. याबाबतची अधिसूचना नगर विकास विभागाच्या सहसचिव डॉ. प्रतिभा भदाने यांनी जारी केली आहे.

जेवणानंतर भांडी घासण्यावरुन वाद, मित्राची हत्या; आरोपातून एकाची निर्दोष मुक्तता

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड येथील उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या कंपनीच्या कामगार वसाहतीत दोन कामगारांमध्ये रात्री जेवण झाल्यानंतर भांडी घासण्याच्या कारणावरून झालेल्या मित्राच्या हत्येच्या आरोपातून एकाची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

अनिल महावीर खाडिया असे निर्दोष मुक्तता केलेल्याचे नाव आहे. आरोपीतर्फे ड. राकेश सोनार यांनी न्यायालयात कामकाज पाहिले. बांधकाम कंपनीचे मॅनेजर यांनी सांगवी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. आरोपी तर्फे ड. राकेश सोनार यांनी आरोपीची बाजू मांडताना न्यायालयात हे निदर्शनास आणून दिले की, सरकार पक्षातर्फे व तपास अधिकारी यांनी सदरच्या गुन्हा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार न्यायालयात तपासले गेले नाही. तपासात अशा कुठल्याच प्रकारचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवले नाही, आरोपी यांनी त्याचा मित्र अकबर सिंग यांच्यासमोर दिलेला कबुली जबाब हा हा पुरावा आरोपीस शिक्षेसाठी भक्कम असा पुरावा नाही, तसेच न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेचा आलेला सर्व वैज्ञानिक पुरावे पाहता आरोपीने गुन्हा केल्याचा सिद्ध होत नाही. अँड. राकेश सोनार यांनी केलेला युक्तिवाद गृहीत धरून न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात ड. राकेश सोनार यांना ड. महेश देशमुख, उमंग यादव, प्रज्वल पवार, शाक्य सुवी, कुमार खराडे, ऋत्विक जाधव, ड. अनिल भानवसे, ड. अविनाश खुडे यांनी सहकार्य केले.

राजेगावला महामानवाला अभिवादन

राजेगाव । प्रतिनिधी

राजेगाव (ता. दौंड) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध ठिकाणी संस्थांच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

राजेगाव येथील सारनाथ बुद्धविहार समाजमंदिर, ग्रामपंचायत राजेगाव, जिल्हा परिषद शाळा, राजेश्वर विद्यालय आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेत डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संदीप भोसले, सारनाथ बुद्धविहार कमिटीचे अध्यक्ष विजेंद्र भोसले, सनी भोसले, संकेत भोसले, अक्षय भोसले, शुभम भोसले आणि आदर्श भोसले आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळेत बालसभेचे आयोजन केले होते. यावेळी मुख्याध्यापक इंद्रभान गोसावी, अप्पासाहेब मेंगावडे, वैशाली कुदळे आदी उपस्थित होते. संजय नेमाने यांनी सूत्रसंचालन केले. तुकाराम उगलमोगले यांनी आभार मानले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी विचार व्यक्त केले.

रक्कम परत न दिल्याने बांधकाम व्यवसायिकाच्या कार्यालयातच सदनिका धारकांचे धरणे आंदोलन

सिंहागड । प्रतिनिधी

सिंहगड रस्ता - सोसायटी देखभालीसाठी घेतलेली रक्कम सोसायटीला अनेक वेळा पाठपुरावा करून देखील परत न केल्याने; सोसायटी सदस्यांनी बांधकाम व्यवसायिकाच्या कार्यालयात धरणे आंदोलन केले.

सिंहगड रस्त्यावरील प्रयेजा पुरम सहकारी गृहनिर्माण संस्थेचे प्रमोटर्स आणि डेव्हलपर्स यांनी सोसायटी स्थापन होऊनही प्रत्येक सदनिका धारकाकडून देखभालीसाठी घेतलेली रक्कम सोसायटीला अनेक वेळा पाठपुरावा करूनही दिली नाही. तसेच सहकारी संस्थेच्या हस्तांतरण केले नाही , सदनिकांची पूर्ण रकमा घेऊन देखील प्रकल्पातील कामे पूर्ण न करून विश्वासघात केला. याच्या निषेधार्थ प्रयेजा पुरम येथील रहिवाशांनी शनिवारी सिंहगड रस्ता येथील प्रयेजा सिटी परिसरातील बांधकाम व्यावसायिकाच्या विक्री कार्यालया समोर दिवसभर धरणे आंदोलन केले. यासोबतच सर्व रहिवाशांनी बांधकाम व्यावसायिकाच्या विक्री कार्यालयात रात्रभर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व रहिवासी बांधकाम व्यवसायिकाच्या विक्री कार्यालयात धरणे आंदोलनासाठी बसलेले आहेत. या संदर्भात सोसायटीच्या वतीने पोलिसांकडे तक्रार देखील दाखल करण्यात आलेली आहे. मेसर्स भंडारी गेलडा असोसिएट यांच्यावतीने विजय बंडुलाल भंडारी व प्रयेजा डेव्हलपर्स तर्फे संदीप नारायण जानी यांनी हा प्रकल्प बांधलेला आहे. या प्रकल्पामध्ये १०८ सदनिका आणि चार दुकाने आहेत. बांधकाम व्यावसायिकाने प्रकल्पाच्या देखभालीसाठी काही सदनिका धारकांकडून दोन वर्षाचा तर काही सदनिका धारकांकडून तीन वर्षांच्या सोसायटी देखभालीसाठी रकमा घेतलेल्या आहेत. सोसायटीची स्थापना होऊनही बिल्डर सहकारी संस्थेचे हस्तांतरण आणि महत्त्वाचे म्हणजे बांधकाम व्यावसायिकाकडे देखभाल शुल्कापोटी सुमारे २८ लाखांची रक्कम अनेक वेळा पाठपुरावा करूनही सोसायटीला हस्तांतरित करत नाही. याच्या निषेधार्थ हे आंदोलन सुरू आहे. बांधकाम व्यावसायिका कडून ही रक्कम मिळाली नाही त्यामुळे अनेक वेळा सोसायटीतील रहिवाशांना विजेचे बिल भरता आले नाही. परिणामी वीज मीटर काढून नेण्यात आले आहे. तसेच लिफ्ट बंद पडल्यामुळे जेष्ठ नागरिकांना त्रास झाला आहे. त्यामुळे बांधकाम व्यावसायिक त्यांच्याकडे असलेली सोसायटीची रक्कम देत नाही तोपर्यंत आम्ही हटणार नाही अशी भूमिका प्रयेजा पुरम येथील रहिवाशांनी घेतली आहे.

अपघातानंतर टेम्पोत अडकेल्या दोघांची सुटका; चाकण एमआयडीसी अग्निशामक दलाची कामगिरी

पिंपरी । प्रतिनिधी

कंटेनर, ट्रक आणि टेम्पो या तीन वाहनांचा चाकण शिक्रापूर रस्त्यावर शनिवारी (दि. ७) पहाटे अपघात झाला. या अपघातात टेम्पोमध्ये दोन जण अडकल्याची माहिती चाकण एमआयडीसीच्या अग्निशामक विभागास मिळाली. एका तासाच्या अथक प्रयत्नानंतर टेम्पोत अडकलेल्या दोन जणांची सुखरूप सुटका करण्यात आली.

विशाल श्रीराम काळदाते (वय २५) आणि वैभव राजेंद्र काळदाते (वय २५, दोघेही रा. चिंचोली, जामखेड) अशी सुटका केलेल्या जखमींची नावे आहेत. चाकण एमआयडीसी अग्निशामक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, चाकण-शिक्रापूर रस्त्यावर शेल पिंपळगाव येथे पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास कंटेनर, ट्रक आणि टेम्पो यांचा अपघात झाला असून त्यामध्ये दोघेजण अडकले असल्याची माहिती चाकण पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक शेख यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. टेम्पोत अडकलेल्या दोघांना सहज बाहेर काढणे शक्य नसल्याने हायड्रोलिक कटर व इतर साहित्याचा वापर करण्यात आला. तब्बल एक तासाच्या अथक प्रयत्नानंतर टेम्पोतील दोन जखमींना बाहेर काढण्यात यश आले. चाकण एमआयडीसीच्या अग्निशामक दलाच्या पथकाचे या कामगिरीबाबत सर्वत्र कौतुक होत आहे. ही कामगिरी चाकण एमआयडीसीच्या अग्निशामक विभागाचे सहायक अग्निशामक अधिकारी राजन फरांदे, व्ही. ए. पवार, व्ही. व्ही. खेडेकर, एस. ए. कुलाल, एल. एच. कचरे यांच्या पथकाने केली.